cmyk

## संपादकीय

### भीकनको, हक्काचे द्या..!

केंद्र सरकारने सुरू केलेल्या मोफत धान्य वाटप योजनेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण टिप्पणी करत केंद्र सरकारला खडसावले आहे. कधीपर्यंत लोकांना मोफत धान्य वाटप केले जाणार आहे? सरकार रोजगाराच्या संधी का निर्माण करत नाही? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारला आहे. मोफत सेवा देण्यापेक्षा स्थलांतरित मजुरांच्या हाताला काम द्या, त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करा, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### २०२५ पासून एनसीईआरटीची पुस्तके स्वस्त होणार - मंत्री धर्मेंद्र प्रधान

नवी दिल्लीः राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदच्या (एनसीईआरटी) काही वर्गांच्या पाठ्यपुस्तकांच्या किमती पुढील वर्षीपासून कमी केल्या जातील, असे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी मंगळवारी (दि.१७) जाहीर केले. प्रधान पुढे म्हणाले की, सध्या दरवर्षी पाच कोटी पाठ्यपुस्तके छापली जातात. परंतु, पुढील वर्षांपासून ही क्षमता १५ कोटींपर्यंत वाढवण्याचे काम सुरू असल्याने एनसीईआरटीच्या किंमतीत घट होणार असल्याचेही ते म्हणाले. २०२६-२७ या शैक्षणिक सत्रापासून इयत्ता ९ वी ते १२ वीच्या अद्ययावत अभ्यासक्रमानुसार नवीन पाठ्यपुस्तके उपलब्ध होतील, अशी माहितीही मंत्र्यांनी दिली.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२३५ | बुधवार, दि.१८ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

# सोयाबीनची माती अन् कापसाच्या झाल्या वाती!

## राज्यपालांच्या अभिभाषणवरून विरोधी पक्षनेते दानवे यांच्याकडून सरकारची झाडाझडती

नागपूर । प्रतिनिधी

**राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे गुलाबी स्वप्न असे म्हणत शेती प्रश्नांवरून विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यपालांच्या भाषणावरून सरकारची झाडाझडती घेतली. सोयाबीन, कापूस दर, पिकविमा, नदीजोड प्रकल्प, सौर कृषी पंप, दूध अनुदान अशा विविध मुद्यांवरून दानवे यांनी मंगळवारी (दि.१७) आकडेवारीसह विधानपरिषदेत जोरदार हल्ला चढविला.**





दानवे म्हणाले, ''राज्यातील सोयाबीन कापूस उत्पादक शेतकरी स्थिती दयनीय आहे. कापसाच्या वाती झाल्या आहेत. तर सोयाबीनची माती उरली आहे. सरकारने सोयाबीनला ६ हजार रुपये दर देण्याची घोषणा निवडणुकीत केली होती. सोयाबीन खरेदीच्या नुसत्या घोषणा केल्या. परंतु खरेदी केंद्र पुरेशा प्रमाणात सुरू करण्यात आली नाहीत. शेतकऱ्यांना बेभाव कापूस विकावा लागत आहे, यासारख्या प्रश्नांकडे राज्यपालांनी अभिभाषणात लक्ष्य वेधणे



पान २ वर

### मराठवाड्यासाठी ४६ हजार कोटींची घोषणा मात्र ४६ रूपये देखील खर्च नाही...

विदर्भ आणि राज्यातील सिंचन प्रकल्पाचा राज्यपालांनी अभिभाषणात उल्लेख केला. राज्य सरकारने पैनगंगा वैनगंगा नदीजोड प्रकल्पांना मंजूरी दिली. परंतु या प्रकल्पासोबत मराठवाडा आणि विदर्भातील मागील दहा वर्षातील सिंचन प्रकल्प पूर्ण झालेली नाहीत. विदर्भ आणि मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष मोठा आहे. मराठवाड्यात राज्य मंत्रीमंडळ बैठक घेऊन ४६ हजार कोटी रुपयांची घोषणा झाली. परंतु त्यातील ४६ रुपये देखील अद्याप खर्च करण्यात आले नाहीत. अशीच परिस्थिती विदर्भातील सिंचन प्रकल्पाची आहे, याकडेही दानवे यांनी लक्ष्य वेधले. पुढे दानवे म्हणाले, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतून आत्तापर्यंत एकूण उद्दिष्टाच्या केवळ सव्वा दोन लाख हेक्टर क्षेत्रचं सिंचनाखाली आले आहे. सिंचनाचे प्रकल्प अपूर्ण आहेत, असे दानवे म्हणाले.

# मारहाणीचा व्हिडिओ रेकॉर्ड करुन कुणाला दाखवला?

**आ.धस आक्रमक; खुनाचा गुन्हा त्यांच्यावर दाखल करा**




नागपुर । प्रतिनिधी

बीडचे तरुण सरपंच संतोष देशमुख यांना जिवघेणी मारहाण करत असतानाचा व्हिडिओ रेकॉर्ड करुन तो कोणाला तरी दाखवण्यात आला. त्या संबंधितावरही खुनाचे कलम लावले पाहिजे अशी मागणी, आमदार सुरेश धस यांनी केली आहे. या प्रकरणातले आरोपी फरार असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला. या निर्घृण हत्येच्या कसून चौकशीची मागणी धस यांनी केली आहे. तसेच ज्यांना तो व्हिडीओ दाखवला त्यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात यावा, असेही ते म्हणाले.

# भुजबळ मोठ्या खेळीच्या तयारीत; अजितदादा नॉटरिचेबल

## जहा नही चैना, वहा नही रहेना! शिल्लक असलेले मंत्रीपद मिळणार?







नागपुर । प्रतिनिधी

**मंत्रीमंडळात समावेश न झाल्याने ओबीसी नेते व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जेष्ट नेते छगन भुजबळ हे कमालीचे नाराज झाले असून जहा नही चैना, वहा नही रहेना, असे म्हणत मोठी खेळी करण्याच्या तयारीत ते असल्याचे दिसते. मंत्रीपदाचा कोटा ४३ असताना ४२ मंत्र्यांनी शपथ घेतली. आता एक मंत्रीपद बाकी असून तेच मंत्रीपद भुजबळांना दिले जाणार असल्याचे विश्वसनीय माहिती आहे. शिवाय हे मंत्रीपद राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नव्हे तर प्रवेश करुन भाजपच्या कोटयातून दिले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर दुसरीकडे अजित दादा दोन दिवसापासून नॉटरिचेबल असून अधिवेशनाला सुध्दा ते हजर नाहीत.**

राज्यात भाजप महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर विलंबाने का होईना मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली. त्यानंतर दहा दिवसाने मंत्रीमंडळ विस्तार झाला. ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली. शपथ घेणाऱ्या मंत्र्यांमध्ये छगन भुजबळ

पान २ वर

### जरांगे-भुजबळ संघर्षातच सर्व काही दडले

ज्या वेळी भुजबळ यांनी मनोज जरांगे यांना आरक्षणावरुन विरोध करत त्यांच्यावर हल्लाबोल चढवला. त्यानंतर दोघांमधील संघर्ष अख्या महाराष्ट्राने पाहिला. भुजबळ यांना फडणवीसांचे पाठबळ असल्याची चर्चा सुध्दा त्यावेळी होत होती. भविष्यात भुजबळ हे भाजपात जातील, असेही म्हटले जात होते. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीचे मुळ त्यावेळच्या जरांगे-भुजबळ यांच्यातील संघर्षात असल्याचे दिसते.

### भुजबळ नेहमीच माझ्या संपर्कात-ठाकरे

भुजबळांच्या जहा नही चैना, वहा नही रहेना या वक्तव्यावर बोलताना उध्दव ठाकरे म्हणाले, तिकडे सरकारची झाली दैना, त्यामुळे भुजबळांचे वहा नही रहेना योग्यच, असे सांगून भुजबळ हे नेहमीच माझ्या संपर्कात असातात, असे सांगून खळबळ उडवून दिली आहे.


# अधिवेशन संपण्यापूर्वी मास्टरमाईंडला अटक करा

## सरपंच देशमुख हत्याप्रकरणी आ.संदीप क्षीरसागर आक्रमक

नागपूर । प्रतिनिधी

**मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या अपहरण प्रकरणात आ.संदीप क्षीरसागर सातत्याने आक्रमक भूमिका घेत प्रकरणाचा मास्टरमाईंड समोर आणण्याची मागणी करत आहेत. यातच नागपूर येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या सत्रातही आ.क्षीरसागर यांनी या गुन्ह्यातील सर्व आरोपी आणि मास्टरमाईंड वाल्मीक कराड ला अटक करण्याची मागणी केली.**

मंगळवारी (दि.१७) रोजी विधीमंडळ अधिवेशनाच्या दुसर्या दिवशी सकाळच्या सत्रात आ.संदीप क्षीरसागर यांनी केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या निघृण हत्या प्रकरणावर आक्रमकपणे प्रश्न उपस्थित केले. स्व.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात करता करविता हा वाल्मीक कराड आहे. परंतु तपासाची दिशा बदलविण्याकरीता आणि प्रकरणावरील लक्ष विचलित करण्यासाठी त्याच्यावर खंडणीचा



पान २ वर



### उद्धव ठाकरे-फडणवीसांमध्ये १० मिनिटं चर्चा

नागपुर । प्रतिनिधी

उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर सर्वांचा भुवया उंचावल्या आहेत. नागपुरातील मुख्यमंत्री दालनात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी फडणवीसांची भेट घेतली. बंद दरवाज्या आड दोन्ही नेत्यांमध्ये १० मिनिटं चर्चा झाली. चर्चा काय झाली हे मात्र समजू शकले नाही.

उध्दव ठाकरे आणि फडणवीस यांची १० मिनिटे चर्चा झाली. फडणवीस यांना भेटून शुभेच्छा दिल्या

पान २ वर



नागपूर - राज्याच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्र्यांचे निकटवर्तीय परमेश्वर येवले, सूरज परमेश्वर येवले व दै. राज्य लोकतंत्रचे बाबुराव बावणे (मामा) यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी कॅबिनेट मंत्री शिवेंद्रराजे भोसले उपस्थित होते.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा द्या

## आ.नमिता मुंदडा यांची विधानसभेत मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचे पडसाद हिवाळी अधिवेशनात आज दुसऱ्या दिवशीही विधानसभेत उमटले. केज विधानसभा मतदारसंघाच्या आ.नमिता मुंदडा यांनी आज आक्रमक पवित्रा घेत या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करून तत्काळ फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी सभागृहात केली.**



संतोष देशमुख यांच्या नृशंस हत्येमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरूला. राज्यभरातून या घटनेचा तीव्र निषेध होत आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अद्यापही फरार असल्याने जनतेत क्षोभ आहे. या हत्याकांडाचे पडसाद

पान २ वर

# भाजपकडून राम शिंदेंना मोठी जबाबदारी

## विधानपरिषद सभापतीपदासाठी नावावर शिक्कामोर्तब; आज अर्ज भरणार

नागपूर । प्रतिनिधी

**विधानपरिषदेच्या सभापतींच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवसेना नेत्या आमदार निलम गोऱ्हे यांनाच पुन्हा सभापतीपदाची संधी मिळेल, असा विश्वास शिवसेना नेत्यांना आहे. मात्र, भाजपकडून राम शिंदे यांना संधी देण्यात येणार असल्याचे समजते. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत राम शिंदे हे कर्जत-जामखेड मतदारसंघातून आमदार रोहित पवार यांच्याकडून पराभूत झाले आहेत. दि. १८ डिसेंबर रोजी ते अर्ज दाखल करणार आहेत.**



फडणवीस सरकारच्या विधिमंडळ अधिवेशनाच्या रणधुमाळीत सध्या विधान परिषदेच्या सभापती निवडीची लगबग पाहायला मिळत आहे. विधानसभा अध्यक्षपदी पुन्हा एकदा राहुल नार्वेकर यांची निवड झाल्यानंतर आता विधानपरिषद सभापतीपदी कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता सर्वानाच आहे. सध्या राज सरकारचं हिवाळी अधिवेशन सुरू आहे. यातच विधानपरिषदेच्या सभापतीच्या निवडीचा मुहूर्त

पान २ वर

### राष्ट्रवादीकडून मुख्य प्रतोद व प्रतोद पदाच्या निवडी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या मुख्य प्रतोदपदी चेतन तुपे यांची निवड होण्याची शक्यता आहे. तर प्रतोदपदी चिपळूणचे आमदार शेखर निकम यांची घोषणा केली जाऊ शकते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून विधानसभा अध्यक्ष यांच्याकडे या दोन्ही आमदारांची नावे पाठविण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१७ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३.०० क्विंटल | २,४५० | २,७०० | २,५७५ |
| ज्वारी/हायब्रिड: ९९.०० क्विंटल | २,०६० | २,५५१ | २,२२१ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १४.५० क्विंटल | ७,२०० | ८,४१० | ७,९९२ |
| उडीद : ५२.०० क्विंटल | ५,८०१ | ७,७८१ | ६,८३८ |
| बाजरी: ४१.५० क्विंटल | २,०८१ | ४,४२० | २,६०२ |
| मुग : ७.०० क्विंटल | ६,२०० | ७,६०० | ६,९४० |
| सोयाबीन: ३६०.०० क्विंटल | ४,००० | ४,१११ | ४,०६१ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ४,२०० | ६,३०० | ४,७७० |

# ९८ व्या मराठी साहित्य संमेलनाला पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्घाटक!

## संमेलन परिसराला छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी असे नाव

नवी दिल्ली । वृतसंस्था

**९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन येत्या २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ रोजी दिल्लीतील तालकटोरा स्टेडियम येथे होणार आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या संमेलनाला यावे, यासाठी शरद पवारांनी त्यांना पत्र लिहीले आहे तसेच शरद पवारांनी पंतप्रधान कार्यालयाशी चर्चा केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी साहित्य संमेलनाला येतील, असा विश्वास शरद पवारांनी व्यक्त केला.**

संमेलनाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी मंगळवारी संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी संमेलनस्थळाची पाहणी केली, यावेळी त्यांनी ही माहिती दिली. शरद पवारांनी तालकटोरा स्टेडियमला भेट देत तिथे उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधा, आसन क्षमता, संमेलनाला येणाऱ्यांची निवास आणि जेवणाची व्यवस्था, पुस्तक प्रदर्शन स्थळ आदी गोष्टींची पाहणी केली आणि आढावा

पान २ वर




### महाराष्ट्राच्या निर्मीतीनंतर दिल्लीत होणारे पहिले संमेलन

७० वर्षापुर्वी दिल्लीत झालेल्या संमेलनाचे उद्‌घाटन तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी केले होते तर काकासाहेब गाडगीळ संमेलनाध्यक्ष होते. महाराष्ट्राच्या निर्मीतीनंतर पहिले संमेलन दिल्लीत होत आहे. या पार्श्वभुमीवर संमेलन परिसराला छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी असे नाव देण्याचे ठरले आहे, असेही संजय नहार म्हणाले. दरम्यान, स्थळ पाहणीप्रसंगी शरद पवार यांच्यासह सरहदचे अध्यक्ष संजय नहार, डॉ. शैलेश पगारिया, अतुल बोकरीया, प्रदीप पाटील, लेशपाल जवळगे आदी उपस्थित होते.

cmyk

## अग्रलेख

# भीकनको, हक्काचे द्या..!

केंद्र सरकारने सुरू केलेल्या मोफत धान्य वाटप योजनेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण टिप्पणी करत केंद्र सरकारला खडसावले आहे. कधीपर्यंत लोकांना मोफत धान्य वाटप केले जाणार आहे? सरकार रोजगाराच्या संधी का निर्माण करत नाही? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारला आहे. मोफत सेवा देण्यापेक्षा स्थलांतरित मजुरांच्या हाताला काम द्या, त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करा, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. मोफत योजनांचा परिणाम हा फार काळ टिकणारा नसतो, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने मोफत रेशन योजनेबाबत हे मत व्यक्त केले. सरकाने भीक नको हक्काचे द्यावे असेच न्यायालयाने केंद्र शासनाला सुनावले असल्याचे यावरून दिसत आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा अंतर्गत केंद्र सरकारने ८१ कोटी लोकांसाठी मोफत किंवा अनुदानित रेशन उपलब्ध केले आहे. तथापि, यामुळे करदात्यांवर आर्थिक भार वाढत आहे आणि न्यायालयाने याचा विचार करत 'मोफत देण्याची मर्यादा कशी निश्चित केली जाईल?' असा प्रश्न उपस्थित केला आहे. स्वयंसेवी संस्थेने दाखल केलेल्या या खटल्यात वकील प्रशांत भूषण म्हणाले की, 'पोर्टलवर नोंदणी केलेल्या स्थलांतरित मजुरांना मोफत रेशन मिळावे.' त्यावर खंडपीठ म्हणाले, 'मोफत किती देणार? या स्थलांतरित मजुरांसाठी रोजगाराच्या संधी, रोजगार आणि क्षमता निर्माण करण्यावर आपण का काम करत नाही.' न्यायालयाने उपस्थित केलेला हा मुद्दा सार्वजनिक संसाधनांचा योग्य वापर आणि लोकांच्या आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेले पाऊल मानले जाऊ शकते. त्यामुळे केवळ मोफत सवलतींवर अवलंबून न राहता रोजगार आणि कौशल्य विकासासाठी व्यापक धोरणे तयार करण्याची गरज आहे. तळागाळात काम करणाऱ्या मजुरांना काम देणे ही काळाची गरज आहे. स्थलांतरित मजूर आणि त्यांच्यासाठी सुरू असलेल्या योजनांची स्थिती निराशाजनक दिसते. केंद्र सरकारने २०२४ च्या अर्थसंकल्पात मनरेगा योजनेसाठी ८६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे; मात्र, मागील वर्षाच्या (२०२२-२३) खर्चावर नजर टाकल्यास, तरतूद ६० हजार कोटी होती. पण प्रत्यक्ष खर्च ८८ हजार ८८० कोटी रुपयांपर्यंत गेला. गेल्या पाच वर्षांच्या आकडेवारीकडे पाहिल्यास, दरवर्षी बजेटमध्ये ठरवलेल्या रकमेपेक्षा जास्त निधी खर्च झाल्याचे दिसून येते. मनरेगा ही कायद्याच्या चौकटीत असलेली विशेष योजना आहे. या योजनेंतर्गत, भारतातील कोणत्याही गावातील १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तीने काम मागितल्यास प्रशासनाला काम देणे बंधनकारक आहे. ही हमी हेच या योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. मनरेगाच्या वेबसाइटवरील आकडेवारी पाहिली तर ती चिंताजनक आहे. सरकारी हमीप्रमाणे एका कुटुंबाला दरवर्षी १०० दिवसांचे काम दिले जाण्याची अपेक्षा आहे; मात्र, महाराष्ट्रात गेल्या आठ वर्षांत सरासरी ५० दिवसांपेक्षा जास्त काम मिळालेले नाही. ही या योजनेची स्थिती आहे. महाराष्ट्रातल्या रोजगार हमी योजनेची परिस्थिती यापेक्षा काही वेगळी नाही. पालघर जिल्ह्यात ४०-५० हजार मजुरांपैकी ७०-८० मजुरांना काम मिळते. त्याचा भत्ता १५-२० दिवसांनंतर मिळत असल्याचे अनेक मजूर सांगतात. अशावेळी हातावर पोट असलेल्या या मजुरांपुढे स्थलांतर हा एकमेव पर्याय उरतो. त्यामुळे सरकारने रोजगाराच्या नुसत्याच थापा मारण्याला काही अर्थ नाही. दुसरीकडे महागाई इतकी वाढली आहे, पण मजुरीत काही वाढ होताना दिसत नाही. अशा स्थितीतही काम केले तरी बरेच दिवस त्याचा मोबदला थकीत राहतो. हातावर पोट असलेल्या मजुरांचा मोबदला थकीत राहिला, तर खाणार काय?

राष्ट्रीय सांख्यिकी संघटनेने (एनएसओ) जारी केलेल्या कामगार सर्वेक्षणाच्या (पीएलएफएस) आकडेवारीनुसार भारताच्या शहरी भागात बेरोजगारीचा दर आर्थिक वर्ष २०२३-२४ या वर्षात जानेवारी ते मार्च या काळात वाढत ६.७ टक्क्यांवर पोहोचला असून, तो दर यापूर्वीच्या तिमाहीत ६.५ टक्के होता. शहरांतील बेरोजगारीचा दर गेल्या चार महिन्यांत उच्च पातळीवर पोहोचला आहे. नव्या सरकारला देशाच्या नव्या 'जॉब सिकर' पिढीसाठी म्हणजे नोकरीची आस बाळगून असलेल्या लोकांसाठी वेगाने रणनीती आखण्याची गरज असताना तसे होताना दिसत नाही.

भारताला अर्थव्यवस्थेचा वेग कायम ठेवण्यासाठी सेवा क्षेत्रापासून निर्मितीपर्यंतच्या सर्व क्षेत्रांना नव्या वेगाने चालना द्यावी लागणार आहे. आंतरराष्ट्रीय श्रम (कामगार) संघटनेनुसार २०२२ मध्ये भारतातील बेरोजगारीचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ८३ टक्के होते. ते आता वाढले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारसमोर बेरोजगारी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे. जागतिक बँकेनुसार भारतात एकूण लोकसंख्येपैकी ५८ टक्के लोकांच्या हाताला काम असून, हे प्रमाण आशिया खंडातील समकक्ष देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. त्यामुळे सर्व मोफत वाटप करण्यापेक्षा सरकारला बेरोजगारीच्या चिंताजनक आकड्यांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

# अंबाजोगाई शहरानजीक बनावट दारूचा कारखाना, ३६ लाख रूपयांचा ऐवज जप्त

## राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाची कारवाई

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने अंबाजोगाई शहरातील बुट्टेनाथ दरी मध्ये असलेल्या बनावट दारू च्या कारखान्यावर धाड टाकून ३६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केल्या मुळे खळबळ उडाली आहे.**

मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड श्री. विश्वजीत ए. देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. १६.१२.२०२४ रोजी गुप्त माहितीच्या आधारे मौजे बुट्टेनाथ दरी येथे काटवन झाडीत असलेल्या गोडावून शेडमध्ये ता. अंबाजोगाई जि. बीड येथे कार्यालय निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रं. ०२ बीड, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, अंबाजोगाई, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क माजलगाव, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क बीड यांच्या पथकाने कारवाई करत छापा टाकला असता सदरील गोडावून पत्री शेडमध्ये खालील प्रमाणे मुद्येमाल जप्त करण्यात आला. या मध्ये १) बनावट देशी दारु रॉकेट मद्याच्या १०५०० बॉटल (१०५ बॉक्स) त्याची अं.कि. रु. ३६७५००/- २) एक जेएसएल जिंदाल स्टेनलेस कंपनीचे स्वयंचलित सिलींग, फिलींग व बॉटलींग मशीन अं.किं. रु. १५००००/- ३) २०० लि. मापाचे स्पीरीटने भरलेले प्लास्टीक बॅरल अं.किं. रु. २५०००/- ४) २०० लि. मापाचे १२ रिकामे प्लास्टीक बॅरल अं.किं. रु. ६०००/- ५) ९० मिली क्षमतेच्या १००८०० प्लास्टीकच्या रिकाम्या बाटल्या अं.किं. रु. १००८००/- ६) देशी दारु रॉकेटचे ३०००० बुचे अं.किं. रु. ३००००/- ७) देशी दारु रॉकेटचे ८००० लेबल अं.किं. रु. १६०००/- ८) २००० लि. व ५०० लि. चे एकुण ३ पाण्याचे बॅरल अं.किं. रु. ९०००/- ९) पाण्याची मोटार २ नगर अं.किं. रु. १००००/- १०) प्रवरा प्रिंट चे ६० टेप रोल अं.किं. रु. ३०००/- ११) देशी दारु रॉकेट बॉक्स चे पुठ्ठे १००० नग अं.किं. रु. २०००/- १२) ५ अल्कोहोल मीटर अं.किं. रु. २५००/- १३) विविध कंपनीचे ४ भ्रमणध्वनी अं.किं. रु. ७५०००/- १५) एक किया कंपनीचे सेलटॉस चारचाकी कार जिचा नोंदणी क्रं. एमएच-१२ आरवाय- ४४०६ अं.किं. रु. १००००००/- १६) एक अशोक लेलँड कंपनीचे आयशर टेम्पो ज्याचा नोंदणी क्रं. एमएच-४० सीडी ३४२१ अं.किं. रु. १७०००००/- १७) १० लिटर क्षमतेचे इसेंस ने भरलेले प्लास्टीक कॅन अं.किं. रु. ७५००/- १८) पाण्याचे प्लास्टीकचे पाईप- ५ नग अं.किं. रु. २५००/- १९) एक आर.ओ. पाणी फिल्टर मशीन अं.किं. रु. ५०,०००/- असा एकुण रू. ३५,५६,८००/- किंमतीचा मुद्?देमाल जप्त



केला आहे. या गुन्ह्यातील आरोपी १) आकाश गोवर्धन नेहरकर (वय : २९ वर्षे), रा. गांधीनगर, अंबाजोगाई जि. बीड २) दिलीप शांतीलाल पावरा, वय : १७ वर्षे, रा.भोईटी ता.शिरपूर जि.धुळे ३) विकेश रघु ब्राम्हणे, वय : १७ वर्षे, रा.भोईटी ता.शिरपूर जि. धुळे ४) जयम लालू पावरा, वय : १७ वर्षे, रा.महादेव दोंडवाडा ता.शिरपूर जि. धुळे ५) किरण दिलीप पावरा, वय : १५ वर्षे, रा.भोईटी ता.शिरपूर जि. धुळे ६) ईश्वर भाया पावरा, वय : १७ वर्षे, रा. महादेव दोंडवाडा ता.शिरपूर जि.धुळे यांना अटक करण्यात आली असुन पप्पू कदम व दिनेश गायकवाड हे फरार झाले असुन त्याचा शोध सुरु आहे. या आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ च्या विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई ही विश्वजीत ए.देशमुख (अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बीड) यांच्या मार्गदर्शनाखाली डी.डी.चौरे (निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रं. ०२ बीड), आर.बी.राठोड, (निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बीड), डी.आर.ठोकळ दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अंबाजोगाई, ए.एल.कारभारी, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क भ.प. क्रं. ०२ बीड, तसेच आर.बी.कदम स.दु.नि., जवान- एस.व्ही.धस, आर.ए.जारवाल, बी.के.पाटील, आर.एम.गोणारे, के.एन.डुकरे, एस.व्ही.लोमटे, डी.एस.वायभट, ए.पी.कदम, श्रीमती एस.एस.ढवळे, आर.जी.मुंडे, एस.एस.ढोले यांनी सदरील कार्यवाही यशस्वीरित्या पार पाडली. पुढील तपास निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रं. ०२ बीड हे करीत आहेत.

## सोमनाथ सूर्यवंशी आणि संतोष देशमुख प्रकरणी केज येथे रिपाइं (ए)ची तीव्र निदर्शने

**केज । प्रतिनिधी**

**परभणी जिल्ह्यातील सोमनाथ सूर्यवंशी आणि केज तालुक्यातील येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाची चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी केज तालुका रिपाइं (ए) च्या वतीने तहसील कार्यालया समोर तीव्र निदर्शने करण्यात आली.**

परभणी येथे संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्याच्या निषेधार्थ भीम अनुयायी शांततेच्या मार्गाने आंदोलन करीत असताना पोलिसांनी जमावावर लाठीचार्ज केला. त्याचे व्हिडिओ चित्रण हा सोमनाथ सूर्यवंशी हा कायद्याचे शिक्षण घेणारा विद्यार्थी करीत असताना पोलिसांनी त्याला अमानुष मारहाण केली. त्या मारहाणीमुळे त्याचा मृत्यू हा न्यायालयीन कोठडीत झाला. त्यांचा शवविच्छेदन अहवाल देखील प्राप्त झालेला आहे. अहवालात त्यांचा मृत्यू हा




मारहाणीमुळे गंभीर जखमा झाल्याने त्यांचा मृत्यू झाला असल्याचा स्पष्ट अहवाल प्राप्त झालेला आहे. तसेच मस्साजोग ता. केज येथे पवनचक्की प्रकल्पाच्या कार्यालयात खंडणी मागणीसाठी गेलेले गुंड हे तेथील सुरक्षा रक्षकांना मारहाण करीत असल्याने सरपंच संतोष देशमुख हे त्यांच्या बचावासाठी तेथे गेले होते. त्याचा राग मनात धरून गुंडांनी संतोष देशमुख यांना टोल नाक्यावर अडवून त्यांचे अपहरण केले आणि अत्यंत निर्घृणपणे व मानवतेला लाजवेल अशा पद्धतीने त्यांची हत्या केली. या दोन्ही घटनेचा निषेध दि. १७ डिसेंबर रोजी रिपाइं (ए)चे नेते सामाजिक न्यायमंत्री ना. रामदास आठवले आणि युवा रिपाईंचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष दिपक कांबळे यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयावर तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष राहुल सरवदे, जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड, जिल्हा सल्लागार उत्तम मस्के, युवा रिपाइंचे निलेश ढोबळे, रमेश निशिगंध, जेष्ठ नेते दिलीप बनसोडे, नाना गायकवाड, सूरज काळे, विनोद गायकवाड, रोहित बचुटे, रंजित कांबळे, दादासाहेब धेंडे, हरेंद्र तुपारे, राजेंद्र धीरे, मसु बचुटे, मिलिंद भालेराव, विनोद शिंदे सरचिटणीस गौतम बचुटे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे. अशा घोषणा देत त्यांना शासकीय मदत मिळावी. तसेच गुन्हेगारांना कठोर शासन व्हावे. तसेच या प्रकरणातील दोषी असलेले पोलीस अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करावे. दलीत वस्त्या मधील कोंबिंग आपरेशन थांबविण्यात यावे. अशा मागण्यांचे निवेदन तहसीलदार राकेश गिड्डे यांना दिले.



**नागपूर - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन विविध मुद्द्यावर त्यांच्याशी जिल्हा बँकेचे अध्यक्ष आदित्य सारडा, चंद्रकांत फड, सलीम जहागीर यांनी चर्चा केली.**

# ऊस तोडणी कामगारांना देण्यात येणाऱ्या अग्रीम रक्कम व्यवहाराला कायद्याचे संरक्षण देण्यात यावे-आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

साखर कारखाना व्यवस्थापन ऊसतोड कामगार कामगारांना अग्रीम उचल रक्कम देतात मात्र त्यासाठी वाहतूकदार आणि मुकादम यांना जबाबदार ठरवून त्यांच्याकडून कायदेशीर दस्तऐवज करून घेतात मात्र ऊस तोडणी कामगारातील काही कामगार हे कामाला न जाता अग्रीम रक्कम इतरत्र खर्च करतात ही रक्कम परत मिळवणे सहजासहजी शक्य होत नाही त्यातून अनेक पेज प्रसंग निर्माण होत असल्यामुळे अनेक मुकादमांनी वाहतूकदारांनी आत्महत्या केलेले आहेत त्यामुळे या उचल रकमे च्या व्यवहारास कायदेशीर संरक्षण मिळावे



यासाठी अशासकीय विधेयक मांडणार आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषण वर आभार व्यक्त करताना आणि राज्य सरकारच्या अभिनंदन प्रस्तावा प्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना आ.धस म्हणाले की,जेव्हा विरोधकांचे 'दिल के टूकडे हजार हुये कोई यहा गिरा कोई वहा गीरा' अशी अवस्था झाली म्हणून आता त्यांनी जनतेला मारकडवाडी दाखविण्याचे काम केले. लोकसभा निवडणुकीमध्ये ३१ खासदार निवडून आले त्यावेळी त्यांनी ईव्हीएमला आक्षेप घेतला नाही आले मात्र विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला त्या वेळी त्यांनी ईव्हीएमला दोष देण्याचे काम सुरू केले आहे हे रडगाणे असून दुर्दैवी असल्याचे सांगत आमदार सुरेश धस यांनी पंतप्रधान नरेंद्र जी मोदी साहेब यांनी पंतप्रधान आवास योजना शहरी आणि ग्रामीण या दोन्हीसाठी घसघशीत वाढ केल्यामुळे गोरगरिबांची घरे तयार होणार असून त्यातून निवारा मिळणार आहे पी एम किसान सन्मान निधी हा शेतकऱ्यांना मोठा आधार असून त्याचा लाभ ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर होत आहे जलजीवन मिशन अंतर्गत ९०% योजना पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण झाली असून त्यासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध व्हावा म्हणजे उर्वरित कामे पूर्ण करून लोकांना प्रत्येक घरी नळाद्वारे पाणी मिळणार आहे ही केंद्र आणि राज्य सरकारची मोठी उपलब्ध ठरणार आहे असे सांगत केंद्र आणि राज्य सरकारने आजपर्यंत राबविलेल्या विविध योजना आणि त्याचा सामान्य जनतेला झालेला फायदा याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील जनतेने प्रचंड बहुमताने महायुती सरकारला पसंती दिली असल्याचे सांगत पश्चिम वाहिनीचे पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात लवकरात लवकर यावे आणि मराठवाडा सुजलाम सुफलाम करण्यात यावा अशी मागणी करीत त्यांनी मुख्यमंत्री सौर ऊर्जा पंप या योजनेअंतर्गत मागेल त्याला सौर कृषी पंप योजना, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र व राज्य सरकारचे अभिनंदन केले. तसेच, सर्व शासकीय कामकाज आणि व्यवहार मराठी भाषेतूनच व्हावा, अशी मागणी केली.मनरेगा योजना अंतर्गत लाभार्थ्यांना मिळणारी रक्कम ही थेट त्याच्या खात्यात जमा करण्याची आवश्यकता आ.धस यांनी व्यक्त केली. छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाला सरकारकडून परवानगी दिल्याबद्दल अभिनंदन केले.यासह आदी योजनांची अभ्यासपूर्ण केलेली मांडणी यावर सभागृहात उपस्थित सर्व सदस्यांनी बाके वाजवून त्यांना प्रतिसाद दिला... सभागृहात अशा विविध मुद्द्यांवर चर्चा करत सरकारच्या निर्णयांचे स्वागत करून त्यांच्या कार्याची प्रशंसा आ.सुरेश धस यांनी केली.

पान १ वरून...

### सोयाबीनची माती अन्

आवश्यक होते, असं म्हणत दानवे राज्यपालांच्या भाषणाची चिरडाफ केली. राज्य सरकार शेतकऱ्यांना १ रुपयात पिकविमा देते. परंतु या पीकविम्याची स्थिती वाईट आहे. २०२३ मधील खरीप आणि रब्बीचा पिकविमा अद्यापही मिळालेला नाही. खरीपातील २४३.९७ कोटी रुपये तर रब्बीतील १९५ कोटी रुपये पिकविमा वाटप बाकी आहे. केंद्र आणि राज्य सरकार पैसे देते, विमा कंपनी विमा मंजूर करते. परंतु शेतकऱ्यांना भरपाई मिळत नाहीत. सरकारच्या जोरावर पीक विमा कंपन्या नफा कमवत आहेत. त्यामुळे सरकारने याकडे लक्ष द्यायला हवे, असे दानवे म्हणाले. राज्य सरकारने कापूस सोयाबीन उत्पादकांना प्रतिहेक्टरी ५ हजार रुपये देण्याची घोषणा केली. परंतु शेतकऱ्यांना अद्यापही अनुदान मिळाले नाही याकडे दानवे यांनी लक्ष वेधले. दानवे म्हणाले, ''सोयाबीन कापूस अनुदानातील १ हजार ४०० कोटी रुपये वाटप अजूनही बाकी आहे. राज्य सरकारने एकूण ४ हजार १९४ कोटी रुपये मंजूर केले होते. त्यापैकी १ हजार ४०० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणे बाकी आहे, असेही दानवे म्हणाले. दूध अनुदानावर सरकारची भूमिका आणि दूध संघाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत दानवे यांनी शेतकऱ्यांना ५ रुपये अनुदानाची रक्कम दीड वर्षांपासून जमा करण्यात आली नसल्याचंही सांगितले. दूध उत्पादकांचे १३० कोटी रुपये अनुदान सरकारने दिले नाहीत. त्यामुळे दूध उत्पादक शेतकरी अत्यंत कठीण अवस्थेत जगतोय, असेही दानवे यांनी सांगितले. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून सौर कृषी पंपासाठी योजना राबवली जाते. राज्याचा विकास त्यातून होईल, असे सांगितलं जाते. परंतु या योजनेसाठी आत्तापर्यंत १२ लाख ४६ हजार ४२६ शेतकऱ्यांनी अर्ज केले. त्यापैकी केवळ १ लाख २९ हजार ८४७ शेतकऱ्यांच्या शेतात सौर कृषीपंप बसवण्यात आले. त्यामुळे व्हेंडर्स वाढवण्याची गरज आहे. तसेच आगामी अर्थसंकल्पात या योजनेसाठी आर्थिक तरतूद वाढवली तरच शेतकऱ्यांना फायदा होईल. कारण विजेचा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यासाठी सरकारने सौर ऊर्जा स्वतंत्र आस्थापना स्थापन कराव्यात, अशी मागणी दानवे यांनी केली.

--------

### भुजबळ मोठ्या खेळीच्या

यांचेही नाव असेल असे सर्वांना वाटले होते. मात्र त्यांना अजित दादांनी वगळले. मंत्री पदाच्या यादीत नाव न घेतल्याने भुजबळ चांगलेच संतापले. माझे मंत्रीपद कोणी कापले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे माझ्या मंत्रीपदासाठी आग्रही होते. मात्र माझे नाव कोणी कापले हे आता शोधावे लागेल, असे भुजबळ म्हणाले. तसेच जहा नही चैना , वहा नही रहेना असेही त्यांनी शायराना अंदाजात आपली खदखद व्यक्त केली. निर्णय प्रक्रियेत मला शुन्य स्थान असून अजित पवार, प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे हेच सर्व निर्णय घेत असल्याचे भुजबळ म्हणाल. दरम्यान छगन भुजबळ यांनी थेट अजितदादांवर हल्ला चढवायला सुरुवात केली असून अजितदादांच्या फोटोला जोडे मारा आंदोलन करु नका, शहाण्याला शब्दाचा मारा पुरेसा असतो, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. एकीकडे भुजबळ आक्रमक झाले असून ते ५ ते १० आमदार घेऊन बाहेर पडणार असल्याची चर्चा आहे. त्यातच मंत्रीपदाचा कोटा ४३ असताना भाजपने मात्र ४२ मंत्र्यांचा समावेश केला असून एक मंत्रीपद शिल्लक ठेवले आहे. त्यामुळे ते भुजबळांसाठीच ठेवले असावे, असेही म्हटले जात आहे. भुजबळ जर १० ते १२ आमदार घेऊन राष्ट्रवादीतून बाहेर पडले तर ते भाजपात प्रवेश करु शकतात, असेही म्हटले जात असून त्यावेळी त्यांना शिल्लक असलेले कॅबिनेट मंत्रीपद भाजपच्या कोट्यातून दिले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दुसरीकडे भुजबळ नाराज झाल्यापासून अजितदादा नॉटरिचेबल असून त्यांच्या बंगल्या बाहेर अजितदादा उपलब्ध नसल्याचा बोर्ड लावला आहे. त्यावरुन अजितदादांचे चांगलेच टेंशन वाढले असल्याचे दिसत आहे.

-------------

### उद्धव ठाकरे-फडणवीसांमध्ये १०

असल्याचे ठाकरे म्हणाले. त्यानंतर उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली. पण नार्वेकरांच्या कार्यालयाकडे जाण्यापूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्यालय होते. पण उद्धव ठाकरे यांनी त्या दिशेला तोंड करुनही पाहिलं नाही. दरम्यान उद्धव ठाकरे विधानसभा अध्यक्षांच्या दालनात असतानाच, तिथे नेमके शिवसेनेचे मंत्री शंभुराज देसाई आणि आशिष जयस्वालही आले होते. मात्र ते लगेचच अध्यक्षांच्या दालनातून बाहेर पडले.

--------------

### अधिवेशन संपण्यापूर्वी

गुन्हा दाखल केला आहे. स्व.देशमुख यांच्या अपहरण आणि हत्या प्रकरणात वाल्मीक कराड हाच मास्टरमाईंड आहे, हे संपूर्ण जिल्ह्याला माहीत असताना अपहरण आणि खूनाच्या प्रकरणातून नाव वगळण्यात आले आहे. त्यामुळे या गुन्ह्यातील मास्टरमाईंड वाल्मीक कराड ला अधिवेशन संपण्यापूर्वी अटक करा अन्यथा जिल्ह्यातील जनतेचा प्रचंड रोष आहे, आणि त्या रोषाला, सत्ताधाऱ्यांना सामोरे जावे लागणार असल्याचे सांगितले. यासोबतच आमदार असताना सुरक्षेसाठी पोलीस विभागाकडून एक अंगरक्षक देण्यात येतो पण वाल्मीक कराड सारख्या गुन्हेगाराला मात्र दोन-दोन अंगरक्षक देण्यात येतात! असाही प्रश्न आ.क्षीरसागर यांनी यावेळी उपस्थित केला.

-------------

### भाजपकडून राम शिंदेंना

पार पडणार आहे. सध्या शिंदेंच्या शिवसेनेच्या डॉ. निलम गोऱ्हे या विधान परिषदेच्या उपसभापती आहेत. तर, सभापती पद रिक्त आहे. त्यामुळे आता विधान परिषदेच्या सभापतींची देखील लवकरच निवड केली जाणार आहे. भाजपकडून राम शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे. विधानपरिषद सभापती पदासाठी राम शिंदे यांचे नाव चर्चेत आहे, भाजपकडून उद्या सकाळी राम शिंदे अर्ज दाखल करण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे, भाजपकडून राम शिंदे यांचे पुनर्वसन करण्यात येत असल्याचे दिसून येते.

----------

### संतोष देशमुख हत्या प्रकरणातील

हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच उमटण्यास सुरुवात झाली. अधिवेशनाच्या आज दुसऱ्या दिवशी आ. नमिता मुंदडा यांनी औचित्याचा मुद्दा करत हा गंभीर प्रश्न सभागृहात उचलला. आ. मुंदडा म्हणाल्या की, माझ्या मतदार संघातील मस्साजोग येथे दोन वेळेस सरपंच राहिलेले संतोष देशमुख हे अतिशय चांगले व्यक्ती होते. यांनी त्यांच्या गावात खूप चांगले काम केले आहे. अशा या लोकप्रिय व्यक्तीचे भरदिवसा राष्ट्रीय महामार्गावरून अपहरण झाले. तीन तासानंतर त्यांचा मृतदेह आढळून आला. अतिशय अमानवीय पद्धतीने मारहाण करून, हाल हाल करून त्यांचा खून करण्यात आला. देशमुख यांच्या खून प्रकरणी सात आरोपींवर गुन्हा नोंदवण्यात आला. ९ डिसेंबरला हे प्रकरण झाले, मात्र आज आठ दिवस उलटूनही फक्त तीन आरोपी अटकेत आहेत, मुख्य आरोपीसह चार आरोपी अद्यापही फरार आहेत. या सर्वांना तत्काळ अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी. या घटनेमुळे जिल्हाभरातील लोकांमध्ये संताप आहे, भीती आहे. नागरिकांनी बंद पाळून, आंदोलने करून याचा निषेध नोंदवला. लोकांच्या मनातील भीती काढण्यासाठी आणि कायदा सुव्यवस्था याबाबत विश्वास देण्यासाठी सर्व आरोपींना फाशीसारखी कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी आ.नमिता मुंदडा यांनी केली.

**दोन वेळेस घेतली मुख्यमंत्र्यांची भेट**

संतोष देशमुख यांची हत्या झाल्यापासून मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दोन वेळेस भेट घेऊन या प्रकरणाची सखोल चौकशी कारवी, सर्व दोषींना कोणत्याही प्रकारची दयामाया न दाखवता कठोरात कठोर शिक्षा देण्यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती केल्याचेही आ. मुंदडा यांनी सभागृहात नमूद केले. जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था सुरळीत करण्यासाठी तातडीने कठोर पाऊले उचलावीत अशी विनंती देखील आ.मुंदडा यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

-------------

### ९८ व्या मराठी साहित्य संमेलनाला

घेतला. तसेच संमेलन भव्यदिव्य होण्यासाठी नियोजन व्यवस्थित व्हावे, सुरक्षेच्या बाबतीत काटेकोर उपाययोजना कराव्यात, अशा सूचना शरद पवारांनी केल्या. स्थळ पाहणीसाठी शरद पवारांसह आयोजक संस्था सरहदचे अध्यक्ष संजय नहा प्रामुख्याने उपस्थित होते. 'महाराष्ट्र ही सलोख्याची आणि समन्वयाची भूमी आहे. ही ओळख निर्माण होण्यात मराठी वाङ्मयाचा मोठा वाटा आहे. भारताचे वैचारिक प्रतिनिधित्व करण्यात महाराष्ट्राचा आणि मराठी साहित्याचा मोठा वाटा राहिला आहे. यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या माणसांनी साहित्यात आणि देशाच्या जडणघडणीतही महत्त्वाचे योगदान दिले आहे. देशाच्या राजधानीत संमेलन होत असताना महाराष्ट्राच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण करून मराठी साहित्याला जागतिक व्यासपीठावर कसे नेता येईल, यादृष्टीने प्रयत्न या संमेलनाच्या अनुषंगाने करणार असल्याचे यावेळी शरद पवार यांनी सांगितले. यावेळी बोलताना संजय नहार म्हणाले की, हे संमेलन स्मरणीय कसे होईल, या दृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. हे संमेलन मराठी साहित्याचा अनोखा सोहळा ठरणार असून त्यातून मराठी साहित्य आणि सांस्कृतिक बंध विस्तारेल.

------------

cmyk

## गरजूवतांना कपडे वाटप, मानवलोकचा पुढाकार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मानवलोक या सामाजिक संस्थेच्या वतीने रविवारी अंबासाखर कारखाना रोड, यशवंतराव चव्हाण चौक या ठिकाणी रोजी रोटी कमवण्यासाठी आलेल्या गरजवंत कुटुंबांना, जुने स्वच्छ कपड्यांचे वाटप करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून मानवलोक च्या वतीने हा उपक्रम सुरू आहे. अंबाजोगाईतील शहरातील गरजवंत लोक कपडे घेऊन जातात.



कपडे वाटपासाठी मानवलोकचा प्रयत्न

कपडे वाटप करताना असे जाणवते की आजही गरजवंत आणि हाल अपेष्टात जगणाऱ्या कुटुंबांना कपड्यांची गरज आहे. शहरातील अनेक लोक मानवलोक संस्थेकडे कपडेआणुन देतात तसेच जुन्या गृहपयोगी वस्तू भांडे, साड्या लहान मुलांचे कपडे आणून देतात. त्या वस्तु कपडे गरजवंतापर्यंत कसे जातील यासाठी मानवलोकच्या वतीने प्रयत्न केले जातात. अनेक वर्षापासून हा उपक्रम सुरूच आहे.अनिकेत लोहिया,कार्यवाह मानवलोक


राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि.१८ डिसेंबर २०२४

३


# सुविधांअभावी ऊसतोड कामगारांच्या आयुष्याची फरफटत

## ना निवाऱ्याची,ना शिक्षणाची सोय; कुटुंबाचे आयुष्य उघड्यावर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव, बर्दापुर, देवळा, आपेगाव परिसरात ऊसतोडीचा हंगाम जोरात सुरू असून हंगाम संपेपर्यंत ऊसाचा फड हेच कामगारांचे घर असते. कोणत्याही भौतीक सुवीद्या नसतांना उण, वारे, थंडी व पावसात ऊसतोड कामगार आपल्या पोटासाठी काम करतांना दिसत आहेत.**

विधानसभेच्या निवडणूकी नंतर ऊस कारखाण्यांच्या गाळपाला वेग आला आहे. निवडणूक उरकून सर्व कामगार पोटा पाण्याचा प्रश्न सोडवीण्यासाठी ऊसतोडीला गेले आहेत. अंबाजोगाई तालुक्यात मोठे ऊसाचे क्षेत्र असल्याने ऊस तोडीसाठी कामगार ऊस फडात दाखल झाल्याचे चित्र पाहायाला मिळत आहे. अंबाजोगाई तालुक्यातील ग्रीन बेल्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आपेगाव, देवळा, धानोरा तसेच जवळगाव, पुस, बर्दापुर या परीसरात ऊसाच्या फडात कामगार आपल्या कुटूंबासह ऊस तोडीचे काम करतांना दिसून येत आहेत. हे कामगार भल्या पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत ऊन, पाऊस, थंडी सहन करीत काम करीत आहेत. उसाच्या कोपीचा निवारा केलेल्या इवलूशा घरात ऊसतोड कामगारांच्या बालकांचे बालपण फडातच जाते. या कामगारांच्या मुलाचे लग्न



होताच त्यांनाही कोयता हातात घ्यावा लागतो तर उतरत्या वयात आलेल्यांना ही कोयत्याचा आधार असतो. परिसरात अनेक ठिकाणी ऊसतोड सुरू असून भल्या पहाटेपासून त्यांच्या कामाला सुरवात होते. मात्र, या मजुरांच्या नशिबी गाव सोडल्यावर हाल, आपेष्टाच असतात. वेदनादायी आणि संघर्षमय परिस्थितीतच कामगारांची लेकर ऊन, वारा, थंडीत फडातच खेळतात, बागडतात. कारखान्याच्या वतीने या मुलांसाठी निवासी शाळा, वैद्यकीय सेवा असा कुठल्याही सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. यामुळे या कामगारांच्या आयुष्याचा प्रवास संघर्षमय असतो.

### सुविधांचा अभाव तर संसार उघड्यावर

माळरान, आखाडे, गावच्या कडीच्या रिकाम्या जागेवर संसार उघड्यावर टाकून जिवाची पर्वा न करता ऊसतोड कामगारांना कोप्यावरच सहा महिन्यांचा काळ काढावा लागतो. ना दवाखान्याची सोय, ना मुलांचं शिक्षण, ना सुरक्षेची व्यवस्था कुठलीही सुविधा नसते. अनेक वेळेला वन्य व हिंस्र प्राणी, साप, विंचू चावल्याच्याही घटना घडतात, दुखापती होतात. ऊन, वारा, थंडीत काम करावे लागते, तर लहान मुलांच्या आयुष्याची सुरवातही फडातूनच होते. थोडीफार शेती असल्याने त्यातून उदरनिर्वाह भागात नाही. त्यासाठी कुटुंब सोबत घेऊन फिरावे लागते, उघड्यावर संसार थाटून देवाच्या नांवावर ऊन, वारा, थंडीत पहाटेपासून ते रात्री कधीही वाहन भरायला आल्यावर उठून काम करावे लागते. गाव सोडून नव्या, नव्या -गावात भटकंती करावी लागते. कारखान्यांनी वैद्यकीय सुविधा, मुलाबाळांसाठी निवासी शाळेची व्यवस्था करणे गरजेचे आहे. - महेश पवार (ऊसतोड कामगार)

पान ६ वरून...

### संविधानाचा अवमान

येथील प्रकरणात भीमसैनिकावर झालेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घेणे व भीमसैनिकांनी सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीमध्ये मृत्यू झाला आहे त्या निषेधार्थ आज किल्ले धारूर सकल भीम सैनिकांच्या वतीने मोटारसायकल रॅली काढून व धारूरवाशी यांच्या वतीने धारूर शहर बंदचे आव्हान करण्यात आले होते. या बंदला शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी, नागरिकांनी दुकानें बंद करून सहकार्य केले.यावेळी सर्व संविधान प्रेमी सर्व भीमसैनिक सर्वपक्षीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गेवराईत १४ जानेवारीपासून

दि.१४ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वा.कलश पुजन व सायंकाळी ७ वा.दीपप्रज्वलन करुन ह.भ.प. समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या कीर्तनाने महोत्सवाची सुरुवात होणार आहे. नित्यनेमाने रोज रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तने होणार आहेत. बुधवार दि.१५ रोजी पुणे विद्यापीठचे गोल्ड मेडलिस्ट ह.भ.प.प्रा.डॉ. प्रशांत महाराज ठाकरे, गुरुवार दि.१६ रोजी केज येथील ह.भ.प. अंकिता ताई घुले, शुक्रवार दि.१७ रोजी विनोदाचार्य ह.भ.प. भाऊसाहेब महाराज पन्हाळकर, शनिवार दि.१८ रोजी रामायणाचार्य ह.भ.प.उद्धव महाराज चोले, रविवार दि.१९ रोजी श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थान, शिरूर (का.) चे मठाधिपती ह.भ.प. स्वामी विवेकानंद शास्त्री, सोमवार दि.२० रोजी परभणी येथील ह.भ.प. एकनाथ महाराज चत्तर शास्त्री, मंगळवार दि.२१ रोजी आळंदी येथील .... विद्यावाचस्पती डॉ.श्री. रविदासजी महाराज शिरसाठ, बुधवार दि.२२ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत दुर्गाशक्तीगड, भिलवडे चे मठाधिपती ह.भ.प. गणेश महाराज शास्त्री यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल व नंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. तर या भव्य कीर्तन महोत्सव काळात महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रातील मान्यवर, संत महंत तसेच गायक - वादक, टाळकरी हार्मोनियम वादक, विणेकरी, चोपदार आदि गुणीजन वृंद उपस्थित राहणार आहेत.या सर्व कार्यक्रमासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांच्या सह प्रतिष्ठानच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### लोक अदालती मध्ये २३१३

तसेच इतर पॅनल प्रमुख जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष आरडी येवले यांच्यासह वकील संघाचे पदाधिकारी, जिल्हा सरकारी वकील, सर्व सरकारी अभियोक्ता यांची उपस्थिती होती. ही लोक अदालत यशस्वी करण्यासाठी न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी, इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### रंजेगावच्या दोनशे लाभार्थ्यांना

आणि बीडच्या तहसील कार्यालयात हे तक्रारदार वारंवार चकरा मारत असताना त्यांना रेशनमाल अथवा नियमाप्रमाणे लाभ दिला जात नाही. ही बाब गंभीर असल्याने नियम आणि कायद्यातील तरतुदीप्रमाणे दोन्ही कार्यालयातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी देखील देशमुख यांनी केली आहे.

### तीन महिन्यांपासून नियुक्ती

आलेली नाही. त्यामुळे परिचारिका उमेदवारांना उमेदवार महिलांनी दिनांक १६ डिसेंबर पर्यंत नियुक्ती आदेश देण्यात यावे अन्यथा धन्य आंदोलन करण्याचे शहरात देण्यात आला होता त्यानुसार दिनांक १७ डिसेंबर २४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या कार्यालयासमोर एक दिवशी धरणे आंदोलन करण्यात आले.

## श्री स्वामी समर्थ मंदिरामध्ये दत्त जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

अंबड । प्रतिनिधी

येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात श्री दत्त जयंती उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम तसेच भव्य रक्तदान शिबीर संपन्न झाले.या उत्सवात १४० भाविकांनी श्री गुरु चरीत्र पारायण केले. श्री दत्त महाराजांची भव्य पालखी मिरवणुक, फराळदान,नाम जप, एक हजार भाविकांना अन्नदान यासह आयोजित रक्तदान शिबीरामध्ये २९ भाविकांनी रक्तदान केले.



या शिबिरामध्ये सौ.पुनम प्रशांत खोमणे, वैष्णवी विनायक मोगल, मनिषा खराबे, पुनम पांडुरंग जामदरे, सौ.छाया पंढरीनाथ जाधव, पुरुषोत्तम ढोले, किशोर मुर्तडकर, राहुल लाहोटी, शरद जाधव, ऋषीकेश मोटकर, दिनेश काकडे, अशोक काळे, किशन जाधव, अनिल देशमुख, भाऊसाहेब तौर, मयुर वाव्हळ, विनायक, विशाल चव्हाण, संकेत डवरे, यशवंत बिराजदार, संदिप पालवे, साईनाथ म्हस्के, रविंद्र मुंढे, विठ्ठल शेटे, कपिल राऊत, भाग्येश रवनेकर, विनोद शिंदे, नरेंद्र माटोले, नामदेव रेडे आदींनी रक्तदान केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदीराचे अध्यक्ष सतीश सोडाणी, सहसचिव डॉ.सतिष सारडा, कोषाध्यक्ष दत्तात्रय वराडे, सदस्य रमेश सोनवणे, व्यवस्थापक पंढरीनाथ जाधव, पुजारी आदेश शुक्ला, कर्मचारी पुरुषोत्तम ढोले, दिपक चौधरी, शंकर पिरानाईक, सिध्देश्वर जाधव, प्रदिप जिगे, सेवेकरी हरणे, मसुरे, दरक, प्रशांत खोमणे, गणेश सातपुते, उध्दव कानडे, मयुर वाव्हळ, पृथ्वीराज शिंदे यासह अनेक श्री स्वामी समर्थ महिला व पुरुष सेवेकरी व श्री जनकल्याण रक्तपेढी जालनाचे डॉ. शिवराज जाधव, डॉ.वंदना पाटील आदींनी परीश्रम घेतले.

## मंत्रीमंडळात गोपीचंद पडळकरांना डावलल्याने धनगर समाज नाराज

**अंबड । प्रतिनिधी**

नागपुर येथे पार पडलेल्या देवेंद्र फडणवीस सरकारच्या मंत्रीमंडळात भाजपचे स्टार प्रचारक आमदार गोपीचंद पडळकर यांना डावलल्याने धनगर समाजातून रोष व्यक्त केल्या जात आहे भाजपचे सरकार पुन्हा सत्तेवर यावे म्हणून राज्यातील धनगर समाजाने ओबीसीचा प्रमुख चेहरा म्हणून प्रमुख भूमिका घेतली होती



गोपीचंद पडळकर आणि लक्ष्मण हाके यांनी संबंध राज्यातील ओबीसी जागा केला त्याची मोट बांधली लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी भाजप आणि मित्रपक्षाच्या उमेदवारांना निवडून देण्यासाठी एकशिक्का मतदान केले

धनगर बहुल गावात भाजप आणि महायुतीच्या उमेदवारांना लीड देण्यात आलेली असुन नवीन मंत्रीमंडळात धनगर समाजाला न्याय मिळेल अशी अपेक्षा होती मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनगर समाजाचे नेतृत्व असलेले गोपीचंद पडळकर, प्रा.राम शिंदे यांना डावलल्याने समाजातून रोष आणि संताप व्यक्त होत आहे.राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्या विरोधात रान पेटवण्यात गोपीचंद पडळकर यांची मोठी भूमिका असल्याने त्यांना मंत्रीमंडळात जरूर स्थान मिळेल अशी अपेक्षा होती मात्र कालच्या शपथविधीनंतर भ्रमनिरास झाल्याच्या प्रतिक्रिया समाज माध्यमातून उमटलेल्या दिसून आल्या.

धनगर समाजाच्या अनेक बैठका घेणाऱ्या तत्कालीन शिंदे सरकारने धनगर आरक्षण अमलबजावणीसाठी सकारात्मक भूमिका घेतली नाही व ऐनवेळी सरकार म्हणून मदत केली नाही ही बाब विसरून धनगर समाजाने विधानसभा निवडणुकीत मोठ्या ताकदीने भाजपला मतदान करुन तिसऱ्यांदा सत्तेवर आरुढ केले तसेच ओबीसीचा प्रमुख चेहरा म्हणून धनगर समाज भाजपच्या पाठिशी ठामपणे उभे राहिला या बदल्यात समाजाचे नेतृत्व असलेले आ.गोपीचंद पडळकर व आ.प्रा.राम शिंदे यांना मंत्रीमंडळात स्थान मिळेल अशी अपेक्षा होती मात्र त्यांना मंत्री न केल्याने धनगर समाज नाराज झाला आहे.आरक्षण नाही, योजनांसाठी निधी नाही,मंत्रीमंडळात स्थान नाही एकुणच पुन्हा फसवणूक झाल्यासारखे समाजामध्ये चर्चा सुरू आहे.

## नागपूर मेट्रो प्रकल्प टप्पा-२ ला चालना मिळाल्यामुळे नागपूर शहरासह परिसराचा अधिक गतीने विकास होणार -मुख्यमंत्री

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला चालना देण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून १५२७ कोटी रुपयांचे (२०० मिलियन डॉलर) अर्थसहाय्य मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात यासंदर्भात आज सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे नागपूर शहरासह परिसराच्या विकासाला आणखी गती मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आणि आशियाई विकास बँकेच्या संचालक मिओ ओका यांनी अर्थसहाय्याच्या करारावर सह्या केल्या.



नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी आशियाई विकास बँक () आणि युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक () यांच्याकडून एकूण ३५८६ कोटी रुपयांचा वित्तपुरवठा करण्यात येणार आहे. त्यापैकी १५२७ कोटी रुपये आशियाई विकास बँकेकडून मिळणार असून त्यासंदर्भातील करार आज करण्यात आला. महामेट्रोला हा वित्तपुरवठा जपानी येन या चलनामध्ये मिळणार आहे. त्यामुळे कर्जावर तुलनेने कमी व्याज द्यावे लागणार आहे. महा मेट्रोला या कर्जाची रक्कम केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या () माध्यमातून उपलब्ध केली जाणार आहे.

नागपूर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-२ हा खापरी ते एमआयडीसी इएसआर दरम्यान १८.५ किलोमीटर, ऑटोमोटिव्ह स्क्वेअर ते कन्हान नदी दरम्यान १३ किलोमीटर, प्रजापती नगर ते ट्रान्सपोर्टनगर दरम्यान ५.६ किलोमीटर आणि लोकमान्यनगर ते हिंगणा दरम्यान ६.७ किलोमीटर असा एकूण ४३.८ किलोमीटरचा असणार आहे. या मेट्रो प्रकल्पाचा लाभ नागपूर परिसरातील १० लाख रहिवाशांना होणार आहे.यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव आश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, विविध विभागांचे सचिव, आशियाई विकास बँकेचे विविध विषयतज्ज्ञ यांच्यासह महामेट्रोचे संचालक (एसपी) अनिलकुमार कोकाटे, संचालक (वित्त) हरेंद्र पांडे आदी उपस्थित होते.

## अल्पसंख्यांक समाजाच्या योजनाची अंमलबजावणी व्हावी-मोहमद खमरोद्दीन

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय अल्पसंख्याक दिन दरवर्षी १८ डिसेंबर रोजी देशभरात साजरा केला जातो अल्पसंख्यांक दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्यांक दिन उत्साहात साजरा करून अल्पसंख्याकाचे सामाजिक आर्थिक राजकीय व शैक्षणिक प्रश्न सोडवण्यासाठी उपाय योजना राबवण्याची आवश्यकता असल्याची मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे शहराध्यक्ष मोहम्मद खमरुद्दीन यांनी केली आहे जिल्हाधिकारी कार्यालयात दरवर्षी १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्यांक दिन साजरा केला जातो मात्र शासनाच्या आदेशाचे पालन करून केवळ औपचारिकता म्हणून अल्पसंख्यांक कार्यकर्त्यांना निमंत्रण करून कार्यक्रम आयोजित केला जातो



उपरोक्त कार्यक्रमात अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी कोणतेही ठोस प्रयत्न केले जात नाहीत त्यामुळे येत्या १८ डिसेंबर रोजी होणाऱ्या अल्पसंख्याक दिनानिमित्त मुस्लिम सेवाभावी संस्था आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग घेणाऱ्या लोकांना अल्पसंख्यांक समाजाच्या आर्थिक सामाजिक राजकीय आणि शैक्षणिक समस्येवर चर्चा करण्यासाठी आमंत्रित करावे अल्पसंख्याक समाजाच्या विभिन्न प्रश्न सोडवण्यासाठी कसा तोडगा निघावा त्यावर चर्चा होणे काळाची गरज आहे मुस्लिम इतर समाजाच्या तुलनेत सर्वाधिक माग असलेला आहे त्यामुळे मुस्लिम समाजाच्या प्रगती करिता पुढे घेऊन जाण्यासाठी शासकीय प्रशासनाने प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मोहम्मद खमरोद्दीन यांनी म्हटले आहे


जा.क्र./न.प. अंबड/नामांतर २०२४/८२४

कार्यालय नगर परिषद अबड

दिनांक ६/१२/२०२

नाव बदलण्याचा

### जाहिरनामा

अर्जदार श्री. सौ. श्रीमती :-सोनी लवकुश चौधरी

प्रकरण : सर्वे नंबर ११ सहान प्लॉट नं.३१ सिटी सर्व्हे नं.३१२३ न.प.मि नं १८-१६१-३१ चे हस्तांतरन करने बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (३१ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा

| | |
|---|---|
| पुर्व | -प्लॉट नंबर २६ |
| पश्चिम | :- ९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रहता |
| दक्षिण:- | -प्लॉट नंबर ३२ |
| उत्तर | -प्लॉट नंबर ३० |

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**



### जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.- /२०२४

जानकीराम बाबासाहेब घाडगे विरुद्ध ग्रा.पं. आहेरवडगाव पहा

१. जानकीराम बाबासाहेब घाडगे,

रा. आहेरवडगाव ता. जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत एकनाथ गोपाळा धांडगे यांचा दिनांक ०४/०१/१९६० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास आहेरवडाव ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे आहेरवडगाव ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/०१/२०२५ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार,बीड**



### जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.-२०२४

जानकीराम बाबासाहेब धाडवेविरुद्ध ग्रा.पं. आहेरवडगाव

पहा

१. जानकीराम बाबासाहेब घाडगे,

रा. आहेर वडगाव ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत वडजु गोपाळा घाडगे यांचा दिनांक १५/१२ / १९५५-रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास आहेरवडगाव ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे आहेर वडगाव ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/०१/२०२४ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार, बीड**


## छगन भुजबळ यांना मंत्रीपद ना दिल्याने अंबडमध्ये ओबीसी कडून तीव्र आंदोलन

**जालना । प्रतिनिधी**

ओबीसी नेते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगनरावजी भुजबळ साहेब यांना नुकत्याच पार पडलेल्या महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये मंत्रिपद देण्यात आले नाही त्यामुळे संपूर्ण ओबीसी समाजामध्ये अतिशय तीव्र अशी नाराजीची भावना आहे याचाच एक भाग म्हणून आज अंबड शहरांमध्ये सकल ओबीसी समाजात कडून महायुती सरकारचा व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी



काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या विरोधात धरणे आंदोलन करत जाहीर निषेध करण्यात आला यावेळी अंबड शहर व परिसरातील ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते संतप्त ओबीसी बांधवांनी यावेळी अजित पवार यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन देखील केले आणि महायुती शासनाची तसेच नवनियुक्त मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या विरोधात तीव्र अशी घोषणाबाजी केली यावेळी रामभाऊ खरात, नंदू पुंड, रामशेठ लांडे, संदीप खरात, दिनेश गाजरे, डॉक्टर अभय जाधव, शिवा गाजरे ,दिलीप राठोड, विजय खटके ,सुभाष चाटे ,किशोर मुर्तडकर, गोरख हिरे, संतोष राऊत, परमेश्वर राऊत, योगेश राऊत, ईश्वर पिराने, बाबासाहेब बटुळे , बाळू गावडे, बाळासाहेब दखणे, परमेश्वर भागवत , किरण रहाटगावकर, प्रदीप जीवने ,कैलास गादे आदी ओबीसी बांधव उपस्थित होते

cmyk

cmyk

राज्य लोकतंत्र **शेत-शिवार**

बुधवार दि.१८ डिसेंबर २०२४



# मराठवाड्यातील प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठा ८५ टक्क्यांवर

संभाजीनगर : मराठवाड्यातील एकूण ८७९ प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठा ८५.८९ टक्क्यांवर आहे. त्यामध्ये ७५ माध्यमातून ८० टक्के उपयुक्त पाण्यासाठ्यासह ११ मोठ्या प्रकल्पातील ९२.६५ टक्के तर ७५१ लघु प्रकल्पातील ७० टक्के, गोदावरी नदीवरील १५ बंधाऱ्यांमधील ७७ टक्के तर तेरणा, मांजरा, रेणा नदीवरील २७ बंधाऱ्यांमध्ये ८९ टक्के उपयुक्त पाणीसाठ्याचा सामावेश आहे.

मराठवाड्यातील ७५१ लघु प्रकल्पांपैकी दहा प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली आहे. त्यामध्ये जालन्यातील दोन ,बीड व लातूरमधील प्रत्येक एक तर धाराशिवमधील ६ प्रकल्पाचा समावेश आहे. ७५१ लघु प्रकल्पापैकी छत्रपती संभाजीनगरमधील ९८ लघु प्रकल्पात ५४ टक्के, जालनामधील ५७ प्रकल्पात ६३ टक्के, बीडमधील १२६ प्रकल्पात ७४ टक्के, लातूर मधील १३५ प्रकल्पात ८३ टक्के, धाराशिवमधील २०६ प्रकल्पात ६३ टक्के, नांदेड मधील ८० प्रकल्पात ७९ टक्के, परभणीमधील २२ प्रकल्पात ७२ टक्के, हिंगोली जिल्ह्यातील २७ प्रकल्पात ६६ टक्के उपयुक्त पाणी साठा शिल्लक आहे. ७५ माध्यम प्रकल्पांपैकी




छत्रपती संभाजीनगरमधील १६ प्रकल्पात ६८ टक्के, जालन्यातील ७ प्रकल्पात ६५ टक्के,बीडमध्ये १६ प्रकल्पात ९२ टक्के ,लातूरमधील ८ प्रकल्पात ७८ टक्के, धाराशिवमधील १७ प्रकल्पात ८० टक्के, नांदेडमध्ये ९ प्रकल्पात ९० टक्के तर परभणीमधील २ प्रकल्पात ८९ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. मोठ्या ११ प्रकल्पापैकी जायकवाडी ९५ टक्के, येलदरीमध्ये ९७ टक्के, सिद्धेश्वर मध्ये ६८ टक्के, माजलगाव मध्ये ७८ टक्के, मांजरामध्ये ९६ टक्के, ऊर्ध्व पेनगंगामध्ये ९५ टक्के, निम्न तेरणामध्ये १०० टक्के, निम्न मनारमध्ये ८७ टक्के, विष्णुपुरीमध्ये ९२ टक्के, निम्न दुधनामध्ये ६९ टक्के तर सीना कोळेगाव मध्ये ९६ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याचे जलसंपदा विभागाने कळविले आहे.

## ११ लघु, मध्यम प्रकल्प जोत्याखाली

मराठवाड्यातील ७८ मध्यम प्रकल्पांपैकी एक तर ७५१ लघु प्रकल्पांपैकी दहा प्रकल्पामधील पाणीसाठा जोत्याखालीच आहे. जोत्याखाली पाणीसाठा असलेल्या दहा लघुकल्पांमध्ये जालन्यातील २, बीड व लातूरमधील प्रत्येकी एक तर धाराशिवमधील ६ प्रकल्पांचा समावेश आहे. जोत्याखाली पाणीसाठा असलेल्या एकमेव प्रकल्पांमध्ये जालन्यातील प्रकल्पाचा समावेश आहे.याशिवाय छत्रपती संभाजीनगरमधील २ व धाराशिवमधील २ अशा ४ प्रकल्पांमध्ये २५ टक्के पेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक आहे. लघु प्रकल्पांपैकी ६४ प्रकल्पांमध्ये २५ टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर व धाराशिवमधील प्रत्येकी २२, जालन्यातील ९, बीडमधील ८, लातूर, हिंगोली व नांदेडमधील प्रत्येकी एका प्रकल्पाचा समावेश असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.

# ऊस पिकामध्ये 'ब्लॅक बगचा' प्रादुर्भाव; करा हे एकात्मिक नियंत्रण



ऊस पिकात 'ब्लॅक बग' म्हणजेच काळ्या किडीचा प्रादुर्भाव झपाट्याने होत आहे. या किडीचा प्रादुर्भाव साधारणतः एप्रिल ते जून या महिन्यात होतो. ऊस लागवड करणाऱ्या शेतकर्यांनी त्यांच्या ऊस पिकाची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जाणून घेऊ या किडीचे एकात्मिक नियंत्रण उपाय! ब्लॅक बग किडीचा प्रादुर्भाव : उसामध्ये या किडीचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता असते, ज्याला काळे बग असेही म्हणतात. यामुळे उसाचे पीक उद्ध्वस्त होऊ शकते. काळे बग या उसामध्ये आढळणाऱ्या किडीचे वेळीच नियंत्रण न केल्यास संपूर्ण पिकाचा नाश होऊ शकतो. ब्लॅक बग किडीमुळे होणारे नुकसान :काळे किडे ऊस पिकाची पाने आणि देठातील रस शोषून थेट नुकसान करतात. या प्रादुर्भावामुळे पाने कोमेजतात, झाडाची वाढ खुंटते आणि उसाचे उत्पादन कमी होते. शिवाय, काळे बग उसाच्या पिवळ्या पानांचे विषाणू आणि इतर रोगजनकांचा प्रसार करू शकतात, ज्यामुळे पिकाचे होणारे नुकसान वाढते.

एकात्मिक नियंत्रण उपाय : उसाची, शेंगा, तृणधान्ये किंवा भाजीपाला यासारख्या पिकासोबत पीक फेरपालट करावी यामुळे या किडीचा प्रादुर्भावास प्रतिबंध होतो. उसाची वेळेवर लागवड, प्रतिरोधक वाणांसह आंतरपीक घेणे, नियमितपणे तण काढणे आणि योग्य माती व्यवस्थापन यासारख्या उपायांमुळे सुद्धा उसामध्ये काळ्या किडींचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यास मदत होऊ शकते. उसावरील ब्लॅक बगचा प्रादुर्भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमितपणे पिकांचे निरीक्षण करून सुरुवातीच्या काळातच काळ्या बगचा प्रादुर्भाव शोधणे महत्त्वाचे आहे. यामुळे वेळेवर वेळेवर नियंत्रण उपाय करून होणारे जास्तीचे नुकसान टाळता येते. शेतातील ब्लॅक बगच्या संख्येवर लक्ष ठेवण्यासाठी पिवळे चिकट सापळे किंवा स्वीप नेट वापरावे. या किडीच्या प्रतिबंधासाठी व्हर्टिसिलियम लॅकनी १.१५ टक्के डब्ल्यू. पी. ते ४००-५०० लिटर पाण्यात २.५ किलो प्रति हेक्टर या प्रमाणात मिसळून आवश्यकतेनुसार १५ दिवसांच्या अंतराने संध्याकाळी फवारणी करावी. भुंगे, ढेकूण आणि कोळी यासारखे कीटक ब्लॅक बगला खाऊन त्यांचे नियंत्रण करण्यास मदत करतात. क्लोरपायरीफॉस २० टक्के १.५ लिटर ८०० ते १००० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फवारणी करावी.

# रोगमुक्त पिकांसाठी 'असा' करा ट्रायकोडर्माचा वापर

जगात सेंद्रिय शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे तसेच प्रगतशील देशांमध्ये सेंद्रिय शेतीमधील उत्पादनास चांगली मागणी आहे. पिकांवर रोगांचे नियंत्रण करण्याकरिता ट्रायकोडर्मा एक प्रभावी रोग नियंत्रक बुरशी आहे आणि तिचा वापर आपण जैविक शेतीमध्ये रोग नियंत्रणासाठी करू शकतो. अलिकडे रासायनिक बुरशीनाशकाला पर्याय म्हणून ट्रायकोडर्माचा वापर होऊ लागला आहे.

ट्रायकोडर्माचा वापर जमिनीत वास्तवास असणाऱ्या रोगकारक बुरशी जसे फ्युजॅरियम, रायझोक्टोनिया, स्क्लेरोशियम आणि पिथीयम मुळे उद्भवणारे रोग जसे मर, मुळकूज, खोडकुज तसेच काही बियाण्या द्वारे पसरणाऱ्या रोगांच्या नियंत्रणासाठी करता येतो.

ट्रायकोडर्मा कार्य कसे करते? : ट्रायकोडर्मा अपायकारक बुरशीच्या धाग्यांमध्ये विळखा घालून आपले साम्राज्य पसरविते व नंतर या धाग्यांमध्ये छिद्र करून त्यातील पोषक अन्नद्रव्ये शोषून घेते त्यामुळे अपायकारक बुरशीचा विस्तार थांबतो. ट्रायकोडर्मा अपायकारक बुरशीला मारक ठरणारे व्हिरीडी हे प्रतिजैवक सुद्धा तयार करते. अपायकारक बुरशीपेक्षा ट्रायकोडर्माची वाढ लवकर होते त्यामुळे ट्रायकोडर्मा ही बुरशी अन्नद्रव्यांसाठी अपायकारक बुरशी बरोबर प्रतिस्पर्धा करून अपायकारक बुरशीच्या वाढीसाठी लागणारे कर्ब, नत्र, व्हिटॅमिन इत्यादी वापरून घेते त्यामुळे अपायकारक बुरशीची वाढ खुंटते.

ट्रायकोडर्माचा वापर : हल्ली ट्रायकोडर्माच्या दोन प्रजाती मुख्यतेकरून वापरण्यात येतात ट्रायकोडर्मा हरजीएनम आणि ट्रायकोडर्मा व्हिरीडी.

या बुरशीचे संवर्धन २५० ग्रॅम आणि एक किलो पाकिटाच्या स्वरुपात बाजारात मिळते. प्रामुख्याने ट्रायकोडर्माचा वापर बीज प्रक्रिया, रोपांची प्रक्रिया आणि मातीची प्रक्रिया करण्यासाठी केला जातो.

बीज प्रक्रिया : पेरणीच्या वेळी बियाण्यावर पाणी शिंपडून १ किलो बियाणे ३ ग्रॅम ट्रायकोडर्मा सोबत व्यवस्थितपणे मिसळावे.

प्रक्रिया केलेले बियाणे सावलीत वाळवून लगेच पेरणी करावी.

रोपांची प्रक्रिया : ज्या पिकांची लागवड रोपे तयार करून केली जाते त्या पिकांमध्ये लागवडीपूर्वी रोपांची मुळे ट्रायकोडर्मा भुकटी ५०० ग्रॅम, ५ लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात ५ मिनिटांसाठी बुडवून ठेवावीत व नंतर त्यांची लागवड करावी.


मातीची प्रक्रिया : मातीची प्रक्रिया करताना १ ते १.५ किलो ट्रायकोडर्मा २५ ते ३० किलो चांगल्या कुजलेल्या शेणखतात मिसळून १ हेक्टर शेतातील मातीत मिसळावे व शक्य असल्यास पाणी द्यावे.

ट्रायकोडर्माचा प्रभावी वापर होण्यासाठी महत्त्वाचे मुद्दे : पाण्याचा व्यवस्थित निचरा होणाऱ्या जमिनीत ट्रायकोडर्माची वाढ जोमाने होते म्हणून जास्त ओलीत करू नये. जमिनीत सेंद्रिय पदार्थ असल्यास ट्रायकोडर्माची वाढ चांगली होते त्याकरिता शेतात चांगले कुजलेले शेणखत टाकावे.

ट्रायकोडर्मा बुरशीचे पाकिट/ द्रावण जास्त काळ न ठेवता लवकरात लवकर वापरावे तसेच वापर होईपर्यंत त्यांना सूर्यप्रकाशापासून दूर थंड ठिकाणी ठेवावे. बियाण्यांच्या प्रक्रियेकरिता ट्रायकोडर्मा सोबत रायझोबियम, अ‍ॅझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळणारे जीवाणू इत्यादी जैविक खतांचा वापर करता येतो.







# पशू आरोग्यासाठी स्वच्छ दूध उत्पादन

स्वच्छ दूध उत्पादनासाठी गोठा स्वच्छता, दूध काढणी आणि दुग्धजन्य पदार्थांची वाहतूक अशा विविध टप्प्यांमध्ये स्वच्छता राखणे आवश्यक आहे. नियमित लसीकरण आणि आरोग्य हा नियमित कामाचा एक भाग आहे. दूध हे संपूर्ण अन्न आहे. दुधापासून योग्य प्रमाणात चरबी आणि प्रथिने मिळतात. तसेच लॅक्टोज आणि इतर अनेक पोषकद्रव्ये पुरविण्याबरोबरच जीवनसत्त्वे उपलब्ध होतात. शरीराचे आरोग्य आणि सामान्य वाढ होण्यासाठी दूध आवश्यक आहे.

परंतु त्याच्या उच्च पोषण सामग्रीमुळे ते रोगजनक जिवाणूंसह सूक्ष्मजीवांसाठी एक परिपूर्ण वाढीचे माध्यम बनते. हानिकारक सूक्ष्मजंतू दुधाची गुणवत्ता बिघडवतात. स्वच्छ दूध उत्पादनासाठी गोठा स्वच्छता, दूध काढणे प्रक्रिया आणि वाहतूक अशा विविध टप्प्यांमध्ये स्वच्छता राखणे आवश्यक आहे.

आरोग्य व्यवस्थापन : नियमित लसीकरण आणि आरोग्य देखरेख हा नियमित कामाचा एक भाग आहे. आजारी जनावरांसाठी स्वतंत्र गोठा असावा.

आहार पद्धती : आहाराचा दुधाच्या गुणवत्तेवर मोठा प्रभाव पडतो. गायीच्या रुमेनमध्ये योग्य पचन आणि किण्वन करण्यासाठी चारा आवश्यक आहे, ज्याचा थेट दुधाच्या चरबीच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. आहारात पुरेसा चारा नसल्यास गाईमध्ये लो बटर फॅटयुक्त दूध तयार करण्याचा कल असतो.

धार काढण्याच्या पद्धती : पारंपरिक प्रक्रियेत स्ट्रिपिंग आणि पूर्ण हाताने दूध काढण्याची पद्धत आहे. स्ट्रिपिंग करताना सड अंगठा आणि तर्जनी यांच्यामध्ये धरले जाते. हात सडाच्या लांबीच्या



खाली हलविला जातो आणि दूध बाहेर काढण्यासाठी थोडासा दबाव टाकला जातो. पूर्ण हाताच्या पद्धतीमध्ये, सड पाच बोटांनी धरून तळहातावर दाबतात. या दोन पद्धतींपैकी, पूर्ण हात पद्धती चांगली आहे. कारण हाताची स्थिती बदलण्यात वेळ जात नाही. ते वासराच्या दूध पिण्याच्या क्रियेचे अनुकरण करते. पूर्ण हाताने सडावरील दाबावर अधिक नियंत्रण मिळते, ज्यामुळे सडावर अधिक एकसमान आणि सातत्यपूर्ण दाब पडतो.

यंत्राने दूध काढणी : दूध काढणी यंत्रामुळे मानवी चुका शक्य तितक्या कमी करून सातत्यपूर्ण दूध मिळते. यंत्र दर मिनिटाला सुमारे १.५ ते २ लिटर दूध काढते. दूध काढण्याच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी प्रति गाय ५ ते ७ मिनिटे वेळ लागतो. त्या तुलनेत, हाताने दूध काढण्यासाठी एका गायीला सरासरी १५ ते २० मिनिटे लागतात. यंत्राने दूध काढताना कोणताही मानवी संपर्क नसतो. काढलेले दूध बंद कंटेनरमध्ये गोळा केले जाते, दुधामध्ये कोणतेही दूषित पदार्थ पडत नाहीत. यंत्राने दूध काढणे हे अधिक सुरक्षित आणि अधिक आरोग्यदायी आहे.

कास, स्वच्छता : कास स्वच्छता हा दुधाच्या स्वच्छतेचा प्रमुख घटक आहे. कोमट पाणी, जंतुनाशक द्रावणाने कासेचा भाग, सड स्वच्छ करावेत. दूध काढणाऱ्या व्यक्तीने स्वच्छ हाताने दूध काढावे. दूध काढण्याच्या प्रक्रियेदरम्यान धूम्रपान करणे किंवा अन्नपदार्थ हाताळणे टाळावे. दूध काढल्यानंतर लगेच गाळावे. दूध साठविण्यासाठी प्लॅस्टिक किटली टाळावी. कारण त्यांना ओरखडे येऊन अशा ठिकाणी जिवाणू साठतात. त्याऐवजी, स्टेनलेस स्टील किंवा अ‍ॅल्युमिनियमपासून बनवलेली भांडी वापरावीत. ही भांडी स्वच्छ करणे आणि निर्जंतुक करणे सोपे असते.

दूध साठवण : दुधाचा ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी योग्य शीतगृह महत्त्वाचे आहे. दूध काढल्यानंतर लगेच कमी तापमानात साठवल्याने हानिकारक जिवाणूंची वाढ मंदावते. तथापि, दूध ७२ तासांपेक्षा जास्त काळ थंड स्थितीत साठवले तर कमी तापमानात देखील खराब होऊ शकते.

दूध गरम करणे आणि पाश्चरायझेशन : दुधाची सुरक्षा सुनिश्चितसाठी पाश्चरायझेशन ही एक सामान्य पद्धत आहे. तथापि, जास्तीचे पाश्चरायझेशन किंवा दीर्घकाळ गरम केल्याने प्रथिनांवर परिणाम होऊ शकतो.

ज्यामुळे दुधाचा पोत आणि पौष्टिक मूल्य बदलू शकते. यामुळे पाण्यात विरघळणारी जीवनसत्त्व ब आणि क यांचे नुकसान होऊन दुधाचा एकूण पौष्टिक लाभ कमी होतो. दुधाचे नैसर्गिक गुण राखण्याबरोबरच सुरक्षिततेचा समतोल राखण्यासाठी गरम करण्याच्या प्रक्रियेवर काळजीपूर्वक नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

दुधात प्रतिजैविक अवशेष :संसर्गावर उपचार करण्यासाठी दुग्धजन्य जनावरांना प्रतिजैविके दिली जातात, परंतु योग्य कालावधी पाळला गेला नाही तर या औषधांचे अंश दुधात राहू शकतात प्रतिजैविक अवशेष असलेले दूध संवेदनशील व्यक्तींमध्ये अ‍ॅलर्जी निर्माण करू शकते. म्हणून दुधाचे प्रदूषण रोखण्यासाठी दुग्धजन्य प्राण्यांमध्ये प्रतिजैविकांच्या वापराचे निरीक्षण आणि नियमन करणे महत्त्वाचे आहे.




## महत्वाच्या घटना

१२७१ : कुबलई खान यांनी साम्राज्याचे नाव युआन करून राजवंश सुरू केले.
१७७७ : अमेरिकेत पहिले थँक्सगिव्हिंग साजरे करण्यात आले.
१७८७ : न्यू जर्सी हा अमेरिकेचे संविधान स्वीकार करणारा तिसरा देश बनला.
१८३३ : रशियन साम्राज्याचे राष्ट्रगीत गॉड सेव्ह द झार! हे पहिल्यांदा गायले गेले
१९१६ : पहिल्या विश्व युद्धात वेरदून ला झालेल्या लढाई मध्ये फ्रांस ने जर्मनी ला हरविले.
१९३५ : श्रीलंकेत 'लंका सम समाज पार्टी'ची स्थापना
१९४५ : उरुग्वे हा देश संयुक्त राष्ट्र संघटनेचा सदस्य बनला.
१९५६ : जपान ने संयुक्त राष्ट्र संघाचे सदसत्व स्वीकारले.
१९५८ : जगातील पहिले संचार उपग्रह प्रोजेक्ट स्कोर प्रक्षेपित करण्यात आले.
१९६९ : इंग्लंड ने मृत्यू दंडाची शिक्षा समाप्त केली.
१९७८ : डॉमिनिकाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९८८ : ऑस्ट्रेलिया महिलाक्रिकेटसंघाने इंग्लंड ला ८ विकेट ने हरवून लगातार तिसरा वर्ल्ड कप स्वतःच्या नावावर केला.
१९८९ : सव्यसाची मुकर्जी यांनी भारताचे २० वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९५ : अहिंसक मार्गाने सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तनासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल पहिला आंतरराष्ट्रीय गांधी शांतता पुरस्कार टांझानियाचे माजी अध्यक्ष ज्यूलिअस न्येरेरे यांना जाहीर.
२००६ : संयुक्त अरब अमिरातींमध्ये प्रथमच निवडणूका घेण्यात आल्या.
२००७ : जपान ने इंटरसेप्टर मिसाइल ची चाचणी केली.
२००८ : ब्रह्मोस सुपरसोनिक क्रूज मिसाइल चे यशस्वी रित्या प्रक्षेपण.
२०१४ : वजनाने सगळ्यात भारी रॉकेट जीएसएलवी मार्क-३ चे यशस्वी प्रक्षेपण.
२०१६ : इंडोनेशियन हवाई दलाचे वाहतूक विमान पापुआ मधील दुर्गम भागात प्रशिक्षण व्यायाम करताना डोंगरावर क्रॅश झाले, त्यात विमानातील सर्व जण ठार झाले.
२०१६ : भारतीय ज्युनिअर हॉकी टीम ने बेल्जियम ला हरवून जुनिअर वर्ल्ड हॉकी कप जिंकला.
२०१७ : राष्ट्रकुल कुस्ती स्पर्धेमध्ये भारताने ३० पैकी २९ सुवर्ण पदक जिंकले होते.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२० : हेन्रिच रॉथ - जर्मनीतील संस्कृत विद्वान आणि धर्मप्रसारक (मृत्यू: २० जून १६६८)
१७५६ : छत्तीसगढ चे सुप्रसिद्ध संत गुरु घासीदास यांचा जन्म.
१८५६ : सर जे. जे. थॉमसन - इलेक्ट्रॉनच्या शोधाबद्दल १९०७ चे नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ३० ऑगस्ट १९४०)
१८८७ : भिखारी ठाकूर - भोजपुरी भाषेचे 'शेक्सपिअर' (मृत्यू: १० जुलै १९७१)
१८७८ : जोसेफ स्टालिन - सोविएत रशियाचे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ५ मार्च १९५३)
१८९० : ई. एच. आर्मस्ट्राँग एफ. एम. रेडिओचे संशोधक (मृत्यू: ३१ जानेवारी १९५४)
१९२४ : देशाचे १९ वे मुख्य न्यायाधीश एंगेल्गुप्पे सीतामा वेंकटारामिया यांचा जन्म.
१९५५ : विजय मल्ल्या - भारतीय उद्योगपती
१९६१ : माजी क्रिकेटपटू लालचंद राजपूत यांचा जन्म.
१९६३ : ब्रॅड पिट - अमेरिकन अभिनेता व निर्माता
१९७१ : बरखा दत्त - पत्रकार
१९७१ : अरांताक्सा सँचेझ व्हिकारिओ - स्पॅनिश लॉन टेनिस खेळाडू
१९९२ : भारताचे कबड्डी खेळाडू काशिलिंग अडके यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२९ : जीन बाप्टिस्टे लॅमार्क - फ्रेंच शास्त्रज्ञ (जन्म: १ ऑगस्ट १७४४)
१९२० : प्रसिद्ध चित्रकार सदानंद बकरे यांचे निधन.
१९७१ : भारतीय निबंधकार पदुमलाल पुन्नालाल बक्षी यांचे निधन.
१९७३ : भारतीय-पाकिस्तानी धर्मगुरू आणि तत्त्वज्ञ अल्लामाह रशीद तुराबी यांचे निधन. (जन्म: ९ जुलै १९०८)
१९८० : अलेक्सी कोसिजीन - रशियाचे पंतप्रधान (जन्म: २० फेब्रुवारी १९०४)
१९८० : लोकसभेचे सदस्य मुकुट बिहारी लाल भार्गव यांचे निधन.
१९९३ : राजा बारगीर - चित्रपट : दिग्दर्शक. 'सुखाचे सोबती' (१९५८), 'बोलकी बाहुली' (१९६१), 'देवा तुझी सोन्याची जेजुरी' (१९६७), 'मानाचा मुजरा' (१९६९), 'करावं तसं भरावं' (१९७५), 'दीड शहाणे' (१९७९), 'ठकास महाठक' (१९८४), 'गडबड घोटाळा' (१९८६), 'तुझी माझी जमली जोडी' (१९९०) अशा सुमारे नव्वद मराठी व हिन्दी चित्रपटांचे दिग्दर्शन त्यांनी केले.
१९९५ : कमलाकरबुवा औरंगाबादकर - राष्ट्रीय कीर्तनकार.
२००० : मुरलीधर गोपाळ तथा मु. गो. गुळवणी इतिहास संशोधक, वैदिक संस्कृतीचे अभ्यासक.
२००४ : विजय हजारे - क्रिकेटपटू (जन्म: ११ मार्च १९१५)
२०११ : चेक रिपब्लिकचे पहिले अध्यक्ष वाक्लाव हेवल यांचे निधन. (जन्म: ५ ऑक्टोबर १९३६).

cmyk

# बीड जिल्ह्यात ११ महिन्यात १७४ शेतकरी आत्महत्या

**मदत केवळ ६५ आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना** › **१०९ कुटुंबिय मदतीपासून वंचित** › **जिल्हा प्रशासनाला गांभीर्य नाही** › **मुख्यमंत्र्यांना तक्रार :- डॉ.गणेश ढवळे**

बीड । प्रतिनिधी

निसर्गाच्या लहरीपणामुळे पिकत नसलेली शेती आणि वाढते कर्ज आत्महत्येचे प्रमुख कारण मानले जाते.शेतकऱ्यांना कधी नापिकी,कधी मालाला भाव नाही तर कधी पिकांवर पडणारी रोगराई तर कधी अतिवृष्टी यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकडुन नैराश्येपोटी आत्महत्ये सारखं टोकाचं पाऊस उचललं जात आहे.मागील १ जानेवारी २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ या ११ महिन्याच्या कालावधीत बीड जिल्ह्यात १७४ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले आहे. प्रशासनाकडे नोंद असलेल्या १७४ शेतकरी आत्महत्यांपैकी मदतीस पात्र १०५ तर अपात्र १७ तर प्रलंबित ५२ असुन केवळ ६५ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून १ लाख रूपयांची शासकीय मदत मिळाली आहे असुन १०८ कुटुंबीय मदतीपासून वंचित आहेत.संबधित प्रकरणात प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढुन उर्वरित आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना तातडीने मदत द्यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांना केली आहे.

१ जानेवारी २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ दरम्यान शेतकरी आत्महत्यांची शासन दरबारी नोंद खालील प्रमाणे आहे. एकुण १७४ शेतकरी आत्महत्या,पात्र १०५ , अपात्र १७ , प्रलंबित ५२ आणि मदत ६५ अशी नोंद आहे. जानेवारी महिन्यात १८ आत्महत्या त्यापैकी १४ पात्र ४ अपात्र, प्रलंबित ० ,मदत १४ तर फेब्रुवारी महिन्यात १४आत्महत्या पैकी १२ पात्र, अपात्र २, प्रलंबित ०,मदत १२ तसेच मार्च महिन्यात १२ आत्महत्या पैकी १२ पात्र अपात्र ०, प्रलंबित ०,मदत १२ तसेच एप्रिल महिन्यात आत्महत्या १३ पैकी पात्र १२ , अपात्र १ , प्रलंबित ०,मदत ९ तसेच मे महिन्यात १३ शेतकरी आत्महत्या पैकी पात्र १२ , अपात्र १ , प्रलंबित ० ,मदत ०३ तसेच जुन



महिन्यात २९ आत्महत्या, पात्र २३ , अपात्र ०५ , प्रलंबित ०१ ,मदत १३ तसेच जुलै महिन्यात १४ आत्महत्या पैकी पात्र ०८ , अपात्र ०३ , प्रलंबित ०३ ,मदत ०२ तसेच ऑगस्ट महिन्यात १४ आत्महत्या पैकी पात्र ०५, अपात्र ०१, प्रलंबित ०८ ,मदत ०० तसेच सप्टेंबर महिन्यात १५ आत्महत्या पैकी ०७ पात्र, अपात्र ०, प्रलंबित ०८ ,मदत ० तसेच ऑक्टोबर महिन्यात ०९ आत्महत्या पैकी पात्र ०, अपात्र ० , प्रलंबित ०९ मदत ० तसेच नोव्हेंबर महिन्यात २३ आत्महत्या पैकी पात्र ० , अपात्र ०, प्रलंबित २३ मदत ० एकुण ११ महिन्यांत १७४ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यापैकी १०५ मदतीस पात्र,१७ अपात्र तर ५२ प्रलंबित आणि ६५ आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना मदत देण्यात आली आहे.



राज्य सरकारकडुन नैसर्गिक संकट आणि ईतर समस्यांमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आधार मिळावा. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी म्हणून पिक विमा,नुकसानीचे अनुदान, विविध योजना, हमीभाव आदि उपाययोजना राबविण्यात येत असल्या तरी आत्महत्येचे सत्र थांबताना दिसुन येत नाही. सरकारच्या उपाययोजना प्रभावहीन असल्याचे दिसून येते.शासनाकडून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना दिली जाणारी १ लाख रुपयांची मदत सुद्धा वेळेवर दिली जात नाही हे अतिशय खेदजनक असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी दिली. ७ ऑक्टोबर रोजी बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना तातडीने शासकीय मदत मिळावी यासाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले होते.त्याअनुषंगाने दि.१० ऑक्टोबर रोजी नरेंद्र कुलकर्णी तहसीलदार महसूल -२ जिल्हा दंडाधिकारी कार्यालय बीड यांनी आंदोलनाच्या अनुषंगाने नैसर्गिक आपत्ती विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना निवेदनातील नमुद मुद्यांबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करून केलेल्या कार्यवाही बाबत अर्जदार यांना अवगत करावे असे लेखी पत्रक काढले मात्र ऑक्टोबर महिन्यात ०९ आणि नोव्हेंबर महिन्यात २३ शेतकरी आत्महत्या होऊन दोन्ही महिन्यांतील एकुण ३२ प्रकरणे प्रलंबित आहेत.त्यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासनाला शेतकरी आत्महत्यांचे गांभीर्य नसुन केवळ कागदी घोडे नाचवण्यात प्रशासन मग्न असल्याची संतापजनक प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली आहे.

## अॅड.नासेर पठाण यांची त्रिपुरा अभ्यास दौऱ्यासाठी निवड

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन व यशदा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित त्रिपुरा येथील अभ्यास दौऱ्यासाठी तालुक्यातील लुखेगावचे सरपंच अँड. नासेर खान दौलतखान पठाण यांची निवड करण्यात आली आहे.



राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान २०२४-२५ अंतर्गत छत्रपती संभाजी नगर विभागातील अधिकारी व पदाधिकारी यांचा यशदा व महाराष्ट्र शासन यांच्या वतीने दिनांक २३ डिसेंबर ते २७ डिसेंबर या कालावधीत त्रिपुरा राज्यात विवीध ठिकाणी सात दिवसाचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यात विभागातील अधिकारी व महाराष्ट्रातील ४० सरपंच या अभ्यास दौऱ्यासाठी सहभागी होणार आहेत. यात माजलगाव तालुक्यातील लुखेगाव येथील सात वेळा सलग सरपंच पदी निवडुन आलेले अँड. नासेर खान दौलत खान पठाण यांची निवड करण्यात आली आहे.ते आगरताळा येथे दिनांक २२ रोजी रवाना होणार आहेत. त्यांची या दौऱ्यासाठी निवड झाल्याने त्यांचे आमदार प्रकाश दादा सोळंके,अच्युतराव लाटे,सभापती जयदत्त नरवडे वीरेंद्र दादा सोळंके, सुशील दादा डक मोहसीन पटेल आदींनी अभिनंदन केले आहे त्यांच्या या दौऱ्याने निश्चितच लुखेगावच्या विकासात भर पडणार आहे.

## दत्त संस्थान बालाघाटावर दत्त जन्मोत्सव साजरा

बीड । प्रतिनिधी

दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथील संस्थांवर सद्गुरु प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने श्री दत्त जयंती उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला .

दत्त संस्थांवर संपूर्ण दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये दुपारी बारा वाजता दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला यानंतर महा अभिषेक दत्त व महादेवाला दुग्धाभिषेक करण्यात आला. यानंतर दत्त जन्मानिमित्त महिलांनी पाळणा गायन केले. याबरोबरच गोमातेला गोग्रास देऊन गोमातेची



पूजा करण्यात आली. या दत्त जन्मोत्सवानिमित्त सती अनुसयाची उत्कृष्ट झाकी तयार करण्यात आली होती.या झाकी मध्ये सती अनुसयाच्या वेशभूषा कु. प्रार्थना अमोल ढास ने सहभाग नोंदविला. या कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमाला बालाघाटावरील कपिलधारवाडी, मांजरसुंबा, कोळवाडी ,उदंड वडगाव (शिवाजीनगर), ससेवाडी आदी परिसरातील व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय भक्ती भावाने व आनंदी वातावरणामध्ये श्रीदत्त जन्मोत्सव उत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला यावेळी दत्त उपासक श्रीहरी वैजनाथ महाराज यांनी मान्यवरांचे स्वागत केले या कार्यक्रमाला संपूर्ण शिंदे परिवाराने विशेष परिश्रम घेतले.

## बोगस जलजीवन कामे करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करा -मेघडंबर

पाटोदा । प्रतिनिधी

केंद्र शासनाची महत्त्वकांक्षी योजना जलजीवन मिशन योजना २० वीस वर्षाच्या भविष्यासाठी राबविण्यात येत असून या योजनेतून योजनेतून गावातील प्रति युक्ती ४३ ४५ लिटर पाणी मिळावे हा हेतुनी राबविण्यात येते. परंतु पाटोदा तालुक्यात ही योजना निव्वळ कागदावर राहते का काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.



वंचित बहुजन आघाडीच्या वतीने माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदनाद्वारे धनगर जवळका येथील जलजीवन मिशन चे काम बोगस झाले आहे. असे आशयाचे निवेदन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर यांनी दिली आहे. धनगर जवळका येथील जल जीवन मिशन बेसलाईनचे सर्वे गावातील तत्कालीन सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य सर्वांच्या उपस्थितीत झाले होते लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन पाणी टाकीचा जलजीवन मिशनमध्ये समावेश करा अशी विनंती केली होती परंतु टाकीच्या कामात मलिदा शिल्लक राहत नसल्यामुळे जाणीवपूर्वक नवीन अंदाजपत्रकात टाकीचा समावेश करण्यात आला नाही गावातील पाणीपुरवठा वितरण प्रणाली आज रोजी पूर्ण खराब झाली आहे

## अल्पसंख्यांक समाजाच्या योजनाची अंमलबजावणी व्हावी-मोहमद खमरोद्दीन

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय अल्पसंख्याक दिन दरवर्षी १८ डिसेंबर रोजी देशभरात साजरा केला जातो अल्पसंख्यांक दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्यांक दिन उत्साहात साजरा करून अल्पसंख्याकाचे सामाजिक आर्थिक राजकीय व शैक्षणिक प्रश्न सोडवण्यासाठी उपाय योजना राबवण्याची आवश्यकता असल्याची मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे शहराध्यक्ष मोहम्मद खमरुद्दीन यांनी केली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात दरवर्षी १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्यांक दिन साजरा केला जातो मात्र शासनाच्या आदेशाचे पालन करून केवळ औपचारिकता म्हणून अल्पसंख्यांक कार्यकर्त्यांना निमंत्रण करून कार्यक्रम आयोजित केला जातो उपरोक्त कार्यक्रमात अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी कोणतेही ठोस प्रयत्न केले जात नाहीत त्यामुळे येत्या १८ डिसेंबर रोजी होणाऱ्या अल्पसंख्याक दिनानिमित्त मुस्लिम सेवाभावी संस्था आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग घेणाऱ्या लोकांना अल्पसंख्यांक समाजाच्या आर्थिक सामाजिक राजकीय आणि शैक्षणिक समस्येवर चर्चा करण्यासाठी आमंत्रित करावे अल्पसंख्याक समाजाच्या विभिन्न प्रश्न सोडवण्यासाठी कसा तोडगा निघावा त्यावर चर्चा होणे काळाची गरज आहे मुस्लिम इतर समाजाच्या तुलनेत सर्वाधिक माग असलेला आहे.

त्यामुळे मुस्लिम समाजाच्या प्रगती करिता पुढे घेऊन जाण्यासाठी शासकीय प्रशासनाने प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मोहम्मद खमरोद्दीन यांनी म्हटले आहे

## वाहनांची नवी मालिका येणार; पसंती क्रमांकासाठी अर्ज करावे

बीड । प्रतिनिधी

परिवहनेत्र दूचाकी वाहनांसाठी नोंदणी मालिका २३ही सद्यस्थितीत सुरू असून सदर मालिकेतील नोंदणी क्रमांकाचे वाटप संपत आलेले आहे. त्या अनुषंगाने परिवहनेत्तर दुचाकी २३ ०००१ ते ९९९९ ही मालिका दिनांक ३० डिसेंबर २०२४ पासून सुरु करण्यात येणार आहे.

ज्या वाहनधारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावायचा असेल त्यांनी आपला विहित नमुन्यातील अर्ज आकर्षक क्रमांकला लागू असलेली फीच्या रकमेचा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बीड यांच्या नावाचा धनादेश डी.डी व आपल्या ओळखपत्राच्या व आधार कार्डच्या साक्षांकीत प्रतिसह दिनांक १७ डिसेंबर २०२४ ते २४ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी २.०० पर्यंत कॅश काउंटर खिडकी क्रमांक २ वर जमा करावा. सदर मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप महाराष्ट्र मोटार वाहन नियम व परिवहन आयुक्तांचे परिपत्रिकानुसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झालेल्या अर्जाची नोटीस दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दुपारी ४.०० वाजता प्रसिद्ध करण्यात येईल. दिनांक २७ डिसेंबर २०२४ रोजी एकपेक्षा जास्त अर्ज असलेल्या अर्जदारांनी दुपारी १.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये मूळ शुल्का व्यतिरिक्त अधिक रकमेचा धनादेश जमा केल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता लिलावाची विहित कार्यपद्धती अवलंबून नोंदणी क्रमांकाचे वाटप करण्यात येईल. तरी सर्व वाहन धारकांनी,नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, स्वप्निल माने यांनी केले आहे.

## वाचन संस्कृती रुजवण्यासाठी शिक्षकाने सुरु केली वाचन चळवळ

पिंपळवंडी । प्रतिनिधी

लहान मुलामध्ये शैक्षणिक पुस्तकांसोबत अवांतर वाचनाची गोडी वाढावी व त्यातून वाचनाची आवड निर्माण व्हावी.ह्या एकमेव उद्देशाने प्रेरीत होऊन पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.स्वामी अमृत भारती माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यरत असलेले गणित विषयाचे शिक्षक अशोक नजान सर यांनी स्वखर्चाने काही गोष्टीची , विज्ञान विषयक,गंमती जमंती,लहान मुलांच्या गोष्टी असे अनेक प्रकारची पुस्तके खरेदी करून ती मुलांपर्यंत वाचनासाठी पोहचविण्याचे कार्य चालु केले आहे.

सद्याची पिढी ही मोबाईलकडे जास्त प्रमाणात आकर्षित झाल्यामुळे त्यांचे वाचनाकडे दुर्लक्ष होत आहे.चांगले विचार,योग्य ज्ञान मिळवण्यासाठी वाचन अतिशय महत्वाचे आहे.त्याकरिता अगदी बाल वयात विद्यार्थ्यात वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी 'वाचन चळवळ' नावाने एक



चळवळ उभी करण्याचे सरांनी ठरवले त्या करता उद्धव पवार सर,लक्ष्मीकांत घुमरे सर,महेश भोसले सर,राजेंद्र डिसले सर,अमोल लाड सर,राहुल भोसले सर यांसह काही जणांनी योगदानही केले आहे.

प्रत्येक शनिवारी पाटोदा तालुक्यातील एका शाळेला ही पुस्तके अशोक नजान सर स्वतः घेऊन जातात व मुलांना ती वाचनासाठी देतात.मुलं देखील आपल्या अभ्यासाशिवाय हि पुस्तके आवडीने वाचतात.सोबतच वाचनाची आवड निर्माण होत असल्याचे तेथील शिक्षक सांगतात,ज्ञानी व वैचारिक पिढी घडविण्यासाठी वाचन होणं गरजेचे आहे.त्यासाठी मोठ्या प्रमाणात वाचन चळवळ टिकणे गरजेचे असल्याचे सरांनी बोलताना सांगितले

# सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यावर ३०२ चा गुन्हा दाखल करा -पप्पु कागदे

**रिपाइंच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर तिव्र आंदोलन**

बीड । प्रतिनिधी

परभणी येथील दगड फेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी या भिमसैनिकाला पोलिसांनी अमानूष मारहाण केल्यामुळे त्याचा मृत्यू झाला आहे. मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर ३०२ चा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपीना तात्काळ अटक करण्यात यावी. या दोन्ही प्रकरणाची एसआयटी मार्फत सखोल चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी. या मागणीकरिता मंगळवार (ता.१७) रोजी रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हाअधिकारी कार्यालयावर तिव्र आंदोलन करण्यात आले.

परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या समोरील संविधानाच्या प्रतीकृतीच्या विटंबणा प्रकरणी आंबेडकरी अनुयायांच्या वतीने निषेध नोंदविता असतांना, पोलीसांनी केलेल्या अमानुष लाठी हल्ल्यात सोमनाथ सूर्यवंशी या भिमसैनिकाचा



न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. सोमनाथ सूर्यवंशी याला - अमानुषपणे मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर ३०२चा गुन्हा दाखल करण्यात यावा. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निघृणपणे करण्यात आलेल्या हत्या प्रकरणातील आरोपीना अजूनही अटक करण्यात आली नाही, प्रशासनाकडून या प्रकरणी दिरंगाई करण्यात येत आहे. परभणी येथील भिमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याची व संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपीना अटक करून या दोन्ही प्रकरणाची एस.आय.टी. मार्फत चौकशी करून दोषीवर कठोर शासन करण्यात यावे. यावेळी, राजू जोगदंड, मझर खान, किसन तांगडे, महेश आठवले, अविनाश जोगदंड बापू पवार मायाताई मिसळे, रेश्माताई जोगदंड, शेख भाभी, विलास जोगदंड, भैय्यासाहेब मस्के, सुभाष तांगडे, प्रभाकर चांदणे, संभाजी गायकवाड, अक्षय कोकाटे, नागेश दुबळे, सतिष सिनगारे, भाउसाहेब दळवी, भैय्या साळवे, महेंद्र वडमारे, धम्मा पारवेकर, खन्ना गायकवाड, गणेश वाघमारे, नामदेव वाघमारे, पप्पू वाघमारे, भाउसाहेब कांबळे, ,सोनू वडमारे, रवि वीर, मनोज बोराडे, रमेश जावळे, नितीन वाघमारे, शाम वीर, गौतम कांबळे, कुमार अरुण, राहुल कांबळे, भैय्या वाघमारे, भिमराव घोडेराव, आप्पा मिसळे, शहाजी सोनवणे आप्पा शेळके, राजाभाऊ वक्ते,राहुल कोकाटे, सुशील जावळे, अविनाश अवघड, कालिदास ओव्हाळ, बाबासाहेब ठोंबरे,बिभीषण जावळे, राजेंद्र भालेराव, अनंत विद्यागर, अनिल शेंडगे,नवनाथ डोळस,भास्कर जावळे, महादेव इनकर, अनिल सावंत, सिकंदर तांगडे, सनी घरत, बाबू जाधव, यांच्यासह शेकडो रिपाइं कार्यकर्ते उपस्थित होते.

## ड्रोन खरेदी अर्थसहाय्य योजनेसाठी आवाहन

बीड । प्रतिनिधी

कृषी क्षेत्रात ड्रोन (मानव विरहीत वायू यान) च्या वापरास पुरेश्या संधी असून सद्य स्थितीत त्याचा विविध पिकांच्या वाढीच्या अवस्थेत कीटक नाशके, सूक्ष्म मुलद्रव्ये, विद्राव्य खते फवारणी या बाबी व्यतिरिक्त कृषी क्षेत्राशी निगडीत इतर कामासाठी देखील वापर करता येऊ शकतो. ड्रोन वापरामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात, वेळेत व श्रमात बचत होऊन रोजगार निर्मिती होऊ शकते.त्यामुळे केंद्र शासन पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान या योजने अंतर्गत ड्रोन या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे.

सन २०२४-२५ साठी कृषी यांत्रिकीकरण उपअभियान अंतर्गत ड्रोन खरेदीसाठी अर्थसहाय्य या घटकासाठी १०० ड्रोनचा महाराष्ट्र राज्य साठी वार्षिक कृती आराखडा मंजूर करण्यात आलेला असून त्यासाठी शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था तसेच कृषी व तत्सम पदवीधर लाभार्थी यांना अर्ज करता येतो.शेतकरी/संस्था/ कंपनी/पदवीधर अनुदान मर्यादा शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था इ. ४० टक्के अनुदान रक्कम ४.०० लाख मार्गदर्शक सूचनेनुसार किसान ड्रोन व त्याचे संलग्न जोडणी साहित्य याची जी मूळ/वास्तविक किंमत असेल त्यापैकी जे कमी असेल ते अनुदान रक्कम देय राहील.कृषी व तत्सम पदवीधर ५०टक्के अनुदान रक्कम ५.०० लाख अ.जा./ अ.ज/लहान व सिमांतिक/महिला शेतकरी ५० टक्के अनुदान रक्कम ५.०० लाख सर्वसाधारण शेतकरी ४० टक्के अनुदान रक्कम ४.०० लाख आयुक्त, कृषी यांचे निर्देशान्वये ड्रोन या घटकासाठी ऑफलाईन अर्ज न करता इतर औजारांप्रमाणे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन राबविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार लाभार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर लॉगइन करून अर्ज करावेत. कृषि यांत्रिकीकराण - मुख्य घटक - भाडे तत्वावरील सेवा सुविधा केंद्र या घटकामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.त्यामुळे सन २०२४-२४ मध्ये ड्रोन हा घटक ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्यामुळे शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था व कृषी व तत्सम पदवीधर यांनी महाडीबीटी पोर्टलवर या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत. तसेच अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त अर्ज सादर करून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, बीड यांनी केले आहे.

# आ. छगनराव भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलून महायुती सरकारने केला देशातील संपूर्ण ओबीसी समाजाचा अपमान - ॲड. सुभाष राऊत

## बीडमध्ये महात्मा फुले पुतळ्याजवळ समता परिषदेचे काळ्या फिती बांधून निषेध

बीड । प्रतिनिधी

ओबीसी समाज हा भाजपाचा डीएनए आहे असे म्हणणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आणि ज्यांना छगनराव भुजबळ यांच्यामुळे राज्यात सर्वाधिक जागा निवडून आणता आल्या ते राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनी देशातील तमाम ओबीसी समाजाचा बुलंद आवाज असलेल्या कणखर नेतृत्वाला राज्य मंत्रिमंडळातून डावलून देशातील ओबीसी समाजाचा अपमान केला आहे. ज्या ओबीसी समाजामुळे राज्यात महायुती सरकार आले त्या ओबीसी समाजावरील हा मोठा अन्याय असून छगनराव भुजबळ यांच्या पाठीशी उभा असलेल्या ओबीसी समाजाचा अवमान केल्याबद्दल बीड शहरामध्ये समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली समता परिषदेच्या वतीने काळ्या फिती बांधून भव्य धरणे आंदोलन करून महायुती सरकार आणि अजित पवार यांचा निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

नुकतेच मंत्री मंडळाची यादी जाहीर करून अनेक आमदारांना मंत्रीपदाची शपथ देण्यात आली, मात्र यामध्ये ओबीसी समाजाचा बुलंद आवाज असलेल्या आ. छगनराव भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आले. हा छगनराव भुजबळ यांचा अवमान नसून देशातील संपूर्ण ओबीसी समाजाचा अपमान झाला असल्याचे वक्तव्य समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा राज्य अन्न आयोगाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे. मंगळवार दि. १७ डिसेंबर रोजी बीड शहरातील महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले




यांच्या पुतळ्यासमोर समता परिषदेच्या वतीने निषेध धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना ॲड. सुभाष राऊत म्हणाले की, माहिती सरकारला महाराष्ट्रातून सर्वाधिक जागी विजय प्राप्त झालेला आहे. यामध्ये आ. छगनराव भुजबळ यांचा मोठा वाटा आहे. आ. छगनराव भुजबळ यांच्यामुळे राज्यातील तमाम ओबीसी समाज महायुती सरकारच्या पाठीशी उभा राहून मतदान रुपी आशीर्वाद देऊन राज्यात २५० पेक्षा अधिक जागा महायुती सरकारला मिळाल्या आहेत. मात्र महायुती सरकारने आ. छगनराव भुजबळ यांना मंत्रिमंडळाच्या शपथविधीपासून वंचित ठेवल्याने राज्यातील ओबीसी समाजामध्ये महायुती सरकार बद्दल रोष निर्माण झाला आहे. ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागण्यांसाठी सभागृह आणि सभागृहाचे बाहेर रस्त्यावर उतरून लढाई लढण्याची काम आ. छगनराव भुजबळ यांनी गेल्या ४० वर्षापासून अखंडितपणे केलेले आहे. वेळप्रसंगी मंत्री पदाचा राजीनामा देऊन ओबीसी समाजासाठी त्यांनी रस्त्यावर उतरून लढाई लढलेली आहे. यामुळे राज्यातील नव्हे तर देशातील ओबीसी समाज त्यांच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभा आहे. यामुळेच महायुती सरकारला विजयश्री प्राप्त झाला. मात्र ओबीसी समाजाच्या राष्ट्रीय नेत्याला मंत्रिमंडळातून डावल्यामुळे ओबीसी समाजामध्ये महायुती सरकार बाबत रोष निर्माण झाला आहे. याचा निषेध राज्यात सर्वत्र होत असून बीड शहरामध्ये मंगळवार रोजी क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुतळ्यासमोर समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली भव्य धरणे आंदोलन करण्यात येऊन माहिती सरकार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांच्या बद्दल निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी शहराध्यक्ष निखील शिंदे, राम मेजर राऊत, नितीन राऊत, धनंजय काळे, सुमंत राऊत, सावता काळे, मंगेश जमदाडे, संग्राम भोकरे, युवराज गार्दे, ज्ञानेश्वर राऊत, अजय राऊत, कार्तिक गनगे, महेश चौधरी, अजय काळे, महेश राऊत, संजय काळे, संतोष यादव आदींसह समता सैनिक व ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संविधानाचा अवमान व भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी हत्येच्या निषेधार्थ धारूर शहर कडकडीत बंद

किल्लेधारूर । प्रतिनिधी

परभणी येथे झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील संविधान प्रतीची विटंबना केल्याप्रकरणी व सोमनाथ सूर्यवंशी हत्याप्रकरणी कडक कारवाई करण्यात यावी यासाठी धारूर शहर कडडित बंद करण्यात आले.



परभणी येथे भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड केल्यानंतर रस्त्यावर उतरलेल्या आंदोलनकर्त्यांची पोलिसांनी धरपकड केली होती . यातील सोमनाथ सूर्यवंशी याचा परभणी पोलिसांच्या कस्टडीत अमानुषपणे केलेल्या मारहाणीमुळे मृत्यू झाला होता. शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सकल भिमसैनिकांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. परभणी येथील कोंबिंग ऑपरेशन तात्काळ थांबविणे व परभणी पान ३ वर



नागपूर : राज्याचे नवनिर्वाचित मंत्री ना.अतुल सावे यांची आज नागपूर येथे भेट घेऊन शुभेच्छा देताना मनोज ठाणगे.

## लोक अदालतीमध्ये २३९३ प्रकरणे निकाली

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधीसेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष न्या.आनंद एल यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १४ डिसेंबर रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात २३९३ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली.



जिल्ह्यातील प्रलंबित प्रकरणापैकी ११,०४२ प्रकरणे निकालासाठी ठेवण्यात आली. यामध्ये दिवाणी , फौजदारी, मोटार अपघात, भूसंपादनाची प्रकरणे, १३८ एन आय अक्टच्या प्रकरणाचा समावेश होता. त्यापैकी ३३४ प्रकरणे निकाली निघाली आहेत. दाखल पूर्व प्रकरणांमध्ये ४८ हजार ९३४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १९५९ प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण २३९३ प्रकरणे निकाली निघाली. यामध्ये १२ कोटी ९८ लाख ३८ हजार २५९ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली.यावेळी न्यायमूर्ती श्रीमती एस. आर. पाटील, न्यायमूर्ती जी. जी. सोनी,न्या.व्ही.एच.पाटवदकर, न्यायमूर्ती श्रीमती एस. आर. शिंदे पान ३ वर



बीड : धनंजय मुंडे यांची कॅबिनेटमंत्रीपदी निवडझाल्यानंतर नागपूर येथे जावून त्यांचा सत्कार करताना नगरसेवक अमर नाईकवाडे, फारूक पटेल त्यांच्या सहकार्यासह.

## गेवराईत १४ जानेवारीपासून भव्य कीर्तन महोत्सव

### संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या भव्य कीर्तन महोत्सवाची जय्यत तयारी सुरु

गेवराई । प्रतिनिधी

येथील संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने मंगळवार दि.१४ जानेवारी पासून भव्य कीर्तन महोत्सवास प्रारंभ होत असून यावर्षीचा हा द्वी-दशक ( २० ) भव्य कीर्तन महोत्सव श्री स्वामी समर्थ मंदिराजवळ, नगरपरिषद सर्व्हे.नं.६३ च्या सहन जागेवर घेण्यात येणार आहे. कीर्तन महोत्सवात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची



कीर्तन सेवा लाभणार आहे. कीर्तन महोत्सवाचे हे २० वे वर्ष आहे. सध्या कीर्तन महोत्सवाची जोरदार तयारी चालू असून प्रतिष्ठानच्या वतीने सर्व पदाधिकारी आपले योगदान देत आहेत. गेवराईकर या भव्य कीर्तन महोत्सवाची दरवर्षी आतुरतेने वाट पाहत असतात. तरी भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

वै.गुरुवर्य संत भगवानबाबा व वै. संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गेवराई मध्ये संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानतर्फे मागील १९ वर्षांपासून भव्य-दिव्य अशा कीर्तन महोत्सवाचे नियोजनबद्ध आयोजन केले जात आहे. यामध्ये सर्व जाती धर्मातील भाविकांचा लक्षणीय सहभाग असतो. यावर्षीच्या कीर्तन महोत्सवाचा प्रारंभ मंगळवार पान ३ वर

## तीन महिन्यांपासून नियुक्ती मिळाली नाही; निवड झालेल्या परिचारिकांचे धरणे आंदोलन

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या आरोग्य परिचारिका भरती मधील आरोग्य परिचारिका यांना नियुक्ती आदेश तात्काळ देऊन रुजू करून घेण्यात यावे. या मागणीसाठी दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी बीड जिल्हा परिषद समोर राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या आरोग्य विभाग कामगार कर्मचारी शाखेच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले.

या संदर्भात तात्काळ कार्यवाही न केल्यास नागपूर येथे हिवाळी अधिवेशन येथे मोर्चा काढून धरणे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### ८ दिवसात करणे घेण्यात येईल- सीईओ जीवने

दरम्यान परिचारिका महिलांच्या वतीने शिष्टमंडळाने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांची भेट घेतली. येत्या ८ दिवसात या संदर्भात योग्य तो निर्णय घेऊन कारवाई करण्याची आश्वासन त्यांनी दिले.



बीड जिल्हा परिषदेत जाहिरातीनुसार २८४ पैकी पात्र १५० परिचारिका च्या दिनांक १६ जून २०२४ रोजी परीक्षा घेण्यात आली दिनांक १८ जुलै रोजी सदर परीक्षेचा निकाल लागला. दि.१८ ते दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी पात्र परिचारिका महिलांच्या कागदपत्राची पडताळणी करण्यात आली. दि. ७ सप्टेंबर २०२४ रोजी अंतिम निवड यादी जाहीर झाली असतांना गेल्या तीन महिन्यापासून आतापर्यंत नियुक्ती देण्यात पान ३ वर

## रंजेगावच्या दोनशे लाभार्थ्यांना दोन वर्षांपासून रेशनमाल मिळेना

### कायदा पायदळी ! -ॲड. अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील रंजेगाव येथील पात्र असलेल्या दोनशे पेक्षा अधिक लाभार्थ्यांना गेल्या चार महिन्यापासून रेशन माल मिळत नाही. त्यामुळे यात प्रशासनासह जे कोणी दोषी असतील, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी केली आहे.

रंजेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते आसाराम आबुज यांनी पात्र शिधा पत्रिकाधारकांना लाभ मिळावा म्हणून गेल्या चार महिन्यापासून तक्रारी केलेल्या आहेत. या तक्रारी तक्रारदारांनी केलेल्या आहेत. आसाराम आबुज पात्र तक्रारदारांसोबत राहून त्यांना मदत करीत आहेत.

तक्रारदारांपैकी सदुशष्ट तक्रारदार यांना गेल्या दोन वर्षापासून मिळत नाही. त्यांचे कार्ड बंद पडलेले आहेत. नवीन रेशन कार्ड देण्याची मागणी त्यांनी कित्येक वेळेस केलेली आहे. तरी देखील त्यांना नवीन रेशन कार्ड मिळत नाहीत.

तर शंभरावर तक्रारदारांना गेल्या दोन वर्षापासून माल मिळत नाही. हे सर्व शेतकरी वर्गातील असल्याची दिसते. त्यांना कुठलाही लाभ मिळत नाही. पात्र असतानाही दोन-दोन वर्ष माल न मिळणे ही गंभीर बाब आहे.

तक्रारदारांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर ॲड. अजित देशमुख यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांच्यासह अन्य ठिकाणी निवेदनाद्वारे पाठपुरावा चालू केल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी यात तात्काळ लक्ष घातले आहे. लवकरात लवकर रेशन माल आणि लाभ मिळेल, असे त्यांनी ॲड. देशमुख यांना सांगितले आहे. त्यांनी आज आसाराम आबुज यांचे बरोबर चर्चा देखील केली.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमातील तरतुदी प्रमाणे एकही लाभार्थी रेशन मालापासून वंचित राहू नये, ही तरतूद असताना जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय पान ३ वर

## सर्वपक्षीय मदतफेरीत सहभागी व्हा

### मयत देशमुख कुटूंबीयांना आर्थिक मदत करा -आ. प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

मस्साजोग येथील मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांकरीता माजलगाकवरांच्या वतीने मदतीचा हात अभियाना अंतर्गत आज दि. १८ बुधवारी सकाळी छत्रपती संभाजी महाराज चौकातुन मदतफेरी काढण्यात येणार असुन या फेरीत सहभागी व्हा असे आवाहन आमदार प्रकाश सोळंके यांच्या वतीने करण्यात आले आहे.



केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निघृण हत्या करण्यात आलेली असुन त्यांच्या कुटूंबीयांना मदत देण्याचा संकल्प माजलगावकरांच्या वतीने करण्यात आला आहे. बुधवारी सकाळी छत्रपती संभाजी महाराज चौकातुन सकाळी १०.०० वाजता मदतफेरी काढण्यात येणार आहे. तरी सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, सर्व सामाजिक संघटना, युवक - युवतींनी उपस्थित राहुन सढळ हाताने मदत करावी असे आवाहन माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी केले आहे.

## ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनात जाहीर झाले संकल्प

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अकराव्या अंबाजोगाई साहित्य संमेलनात सर्वांच्या उपस्थितीत अनेक संकल्प जाहीर झाले. उच्च दर्जाच्या कविता कानावर पडाव्यात, कविता वाचनाची प्रेरणा मिळावी, यासाठी आद्यकवी मुकुंदराज समाधी परिसरात मान्यवर कवींच्या कवितांचे वाचन असा कार्यक्रम आयोजित करणे.

२०२५ चे अंबाजोगाई ग्रामीण साहित्य संमेलन या वर्षी भावठाणा येथे घेण्यात येईल. अनिकेत लोहिया हे या संमेलनाचे स्वागत अध्यक्ष असतील. अंबाजोगाई ग्रामीण साहित्य संमेलनाचा तपशील मसाप, आंबाजोगाई शाखा ठरवील.

आंबाजोगाई साहित्य संमेलनात दस्तावेज तयार करणे हे एक उद्दिष्ट आहे. दीपमाळ (कविता संग्रह),, मजल (स्मरणिका), मृदगंध (कविता संग्रह), जयवंती (कथा संग्रह), नातीला पत्र (पत्रे), दशकधारा (संमेलन अध्यक्षांची भाषणे), दिवंगत साहित्यिकांचे स्मरण फलक, ही त्याची काही उदाहरणे आहेत. आंबाजोगाईतील साहित्यिकांची नोंद वही (डायरी) काढायचे राहून गेले आहे. अंबाजोगाईची कविता, आंबाजोगाईची कथा, आंबाजोगाईची कादंबरी, इत्यादी साहित्य प्रकार यांचे दस्तावेज तयार करणे महत्वाचे काम राहिलेले आहे. ते पूर्ण करण्यासाठी अंबाजोगाई साहित्य शिष्यवृत्ती सुरू करण्यात येईल. मसाप शाखा अंबाजोगाईकडे फिक्स डिपॉजिट असलेल्या रकमेच्या व्याजातून हे काम पुढे चालविण्यात येईलया कामासाठी किमान पाच लाख रुपये फिक्स डिपॉजिट करावे लागतील. या अनुषंगाने मसाप,अंबाजोगाईच्या खात्यावर एक लाख रुपये आहेत. चार लाख रुपयांची गरज आहे. मसाप तर्फे आंबाजोगाईकरांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी या उपक्रमासाठी आर्थिक मदत करावी. अंबाजोगाईचा सांस्कृतिक, साहित्यिक ठेवा जतन करण्यासाठी आपली देणगी ९४२१४ ४३३९१ या क्रमांकावर पाठवावी असे आवाहन अमर हबीब यांच्यासह मसापच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# भुजबळ समर्थक इरेला पेटले ! थेट बारामतीत जाऊन अजित पवारांच्या घराबाहेर आंदोलन

बारामती । प्रतिनिधी

बारामतीतील उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निवासस्थान असलेल्या सहयोग सोसायटीच्या बाहेर ओबीसी समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात येत आहे. अजित पवारांनी छगन भुजबळ यांचं मंत्रीपद नाकारलं. त्यामुळे आम्ही अजित पवारांच्या घराबाहेर आंदोलन करीत आहोत, असं आंदोलकांचे म्हणणं आहे. तसेच लवकरात लवकर अजित पवारांनी छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान द्यावे, अन्यथा बारामतीत उद्रेक करू. असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.



तसेच २२ तारखेला बारामतीत अजित पवारांचा नागरिसत्कार आहे, त्यावेळेस अजित पवारांना आम्ही जाब विचारू. असं ओबीसी आंदोलकांचे म्हणणे आहे. त्यामुळे काल अजित पवारांच्या प्रतिमेला जोडे मारत केलेल्या आंदोलनानंतर भुजबळ समर्थक इरेला पेटले असून आज थेट बारामतीत जाऊन अजित पवारांच्या घराबाहेर आंदोलन करण्याचा आक्रमक पवित्रा भुजबळ समर्थकांनी घेतला आहे. दरम्यान, कार्यकर्त्यांची बैठक झाल्यानंतर भुजबळांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवत आपले मत व्यक्त केले आहे. मला मंत्रिपद कोणी नाकारलं, हेच शोधण्याचा प्रयत्न सुरु आहे. मंत्रीपद कोणी नाकारलं हे शोधावं लागेल. प्रत्येक पक्षाचा निर्णय हा त्या पक्षाचा प्रमुख घेत असतो. भाजपचा निर्णय देवेंद्र फडणवीस घेतात, तसं शिवसेनेचा निर्णय एकनाथ शिंदे घेतात. तसंच आमच्या पक्षाचा निर्णय अजित पवार घेतात. प्रत्येकाला मंत्रिपद हवं असते. प्रश्न मंत्रिपदाचा नाही, ज्याप्रकारे अवहेलना करण्यात आली, त्याचा आहे, असंही छगन भुजबळ म्हणालेत. मला जे काही कळलं आहे, त्यावरून माझा प्रवेश मंत्रिमंडळात असावा यासाठी मुख्यमंत्री आग्रही होते. त्यांनी आग्रहा धरला होता ते देखील मी निश्चित कन्फर्म करून घेतला आहे. मंत्रीपद कोणी नाकारलं हे शोधावे लागेल असेही ते यावेळी म्हणालेत.

**आमदारांमध्ये छगन भुजबळांविषयी सॉफ्ट कॉर्नर**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बहुतांश आमदारांचं छगन भुजबळ यांना मंत्रिपद द्यायला हव होतं, असं मत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत छगन भुजबळ यांनी ओबीसी समाजाची बाजू लावून धरली, विधानसभेला भुजबळांमुळेच ओबीसी समाज एक व्हायला मदत झाली. त्यामुळे भुजबळांना मंत्री करणं गरजेचं होतं, असं आमदारांचं मत असल्याचे समजते. आता भुजबळांवर अन्याय झाला तर आगामी महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत फटका बसू शकतो, अशी भीती देखील आमदारांमध्ये असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भुजबळांची मनधरणी करण्यात यशस्वी होणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# ३०० भाविकांना शनिशिंगणापूर दर्शन

आळंदी । प्रतिनिधी

शिवसेना आळंदी शहरप्रमुख राहुल ज्ञानेश्वर चव्हाण यांचा वाढदिवस रविवारी (दि. १५) विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त ३०० भाविकांना शनिशिंगणापूर दर्शन, आळंदीतील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात २५० भाविकांना तुळशी रोपांचे वाटप, निजानंद महाराज वेदपाठ शाळेत १५० विद्यार्थ्यांना अन्नदान, नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्थेतील १००, श्रीरामकृष्ण वारकरी शिक्षण संस्थेतील १०० विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले. तसेच माजी नगरसेवक ज्ञानेश्वर रायकर यांच्याकडून अन्नपूर्णा आश्रमात अनाथ मुलांना अन्नदान करण्यात आले. यावेळी, राहुल चव्हाण यांच्यावर आळंदी शहरातील नागरिकांनी शुभेच्छांचा वर्षाव केला.





राहुल चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आळंदीतील नागरिकांसाठी श्री क्षेत्र शनिशिंगणापूर दर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी (दि. १४) रात्री साडेदहा वाजता आळंदीतील ग्रामदैवत भैरवनाथ मंदिरात भैरवनाथाला नारळ वाढवून यात्रेला सुरुवात झाली. यावेळी आळंदी नगरपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश प्रतिनिधी डी. डी. भोसले, माजी नगरसेवक प्रकाश कुर्हाडे, भाजप शहराध्यक्ष किरण येळवंडे, भजनी मंडळाचे पंडितराव रानवडे व त्यांचे सहकारी यांसह उपस्थित नागरिकांनी यात्रेला शुभेच्छा दिल्या. ३०० भाविकांना घेऊन बस शनिशिंगणापूरला निघाली. रात्री अडीच वाजता शिंगणापूर येथे पोहोचल्यानंतर विश्रांती घेऊन पहाटे चार वाजता स्नान आटोपून शनि देवाचे दर्शन घेण्यात आले. यावेळी देवस्थानकडून राहुल चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला. चव्हाण यांनीही तेथील कर्मचार्यांचा सन्मान केला.

# अभ्यासिका नव्हे साहित्याचे गोडावून; महापालिका प्रशासनाचा अजब कारभार

पुणे । प्रतिनिधी

सिंहगड रस्ता परिसरातील वडगाव बुद्रुक येथे विद्यार्थ्यांसाठी बांधण्यात आलेल्या अभ्यासिका व ग्रंथालयाच्या नवीन इमारतीत महापालिका प्रशासनाने वेस्ट ट्रीटमेंट पावडरच्या गोण्या ठेवल्या आहेत. तसेच वरच्या मजल्यावर इतर साहित्य ठेवल्याने ही अभ्यासिका व ग्रंथालय भंगार मालाचे गोडावून बनले आहे. यामुळे विद्यार्थी आणि नागरिकांनी प्रशासनाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली आहे.



वडगाव बुद्रुक येथील प्रभाग क्र.३३ अ, सर्व्हे नं. ५४ मध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका व ग्रंथालयासाठी तीन मजली इमारत महापालिकेने बांधली आहे. माजी नगरसेवक हरिदास चरवड यांच्या प्रयत्नातून तसेच राजाभाऊ लायगुडे, माजी नगरसेविका राजेश्री नवले, नीता दांगट यांच्या सहकार्यातून ही अभ्यासिका आणि ग्रंथालय उभे राहिले आहे. ७ डिसेंबर २०२१ रोजी या इमारतीचे लोकार्पण तात्कालीन आमदार चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आणि तत्कालीन महापौर मुरलीधर मोहोळ, तत्कालीन आमदार भीमराव तापकीर यांच्या उपस्थितीत झाले होते. परंतु, सध्या ही इमारत महापालिका प्रशासनाने भंगार मालाचे साहित्य ठेवण्याचे गोडवूनच बनविली आहे.

# ओझरच्या महिला पोलिस पाटील यांच्या घरावर हल्ला


ओझर । प्रतिनिधी

किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून ओझर येथील महिला पोलिस पाटील प्रिती सुनील कवडे यांच्या घरावर हल्ला करण्यात आला. याप्रकरणी पोलिस पाटील यांचे पती सुनील जयसिंग कवडे यांच्या फिर्यादीनुसार विघ्नहर देवस्थान ट्रस्टचे माजी अध्यक्ष गणेश जगन्नाथ कवडे व त्यांचे सहकारी यांच्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. ही घटना रविवारी (दि. १५) रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास घडली.

ट्रस्टचे माजी अध्यक्ष गणेश जगन्नाथ कवडे यांच्यासह गणेश हनुमंत कवडे, आशिष विलास कवडे, विनोद सुदाम घेगडे, विजय चिंतामण जोशी, जयेश चिंतामण जोशी, पप्पू ऊर्फ सुभाष दळवी, मल्हारी दत्तात्रय घेगडे, हेमंत दिलीप कवडे, शिवाजी ऊर्फ शिवाभाई बबन कवडे, शुभम शिवाजी कवडे, तेजस जालिंदर ढवळे, शुभम सुरेश रवळे, राजेंद्र विलास कवडे (सर्व रा. ओझर नंबर १, ता. जुन्नर) व इतर १० ते १५ जण (नाव, पत्ता माहीत नाही) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. सुनील कवडे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, रविवारी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास ओझर येथील श्री स्वामी समर्थ मंदिराजवळ माझ्या घरासमोर असणाऱ्या श्री स्वामी समर्थ मंदिराचा साउंड सिस्टिमचा आवाज कमी करा, असे गणेश कवडे म्हणाले. यावरून झालेल्या वादात गणेश जगन्नाथ कवडे याने त्याच्यासोबत वर नमूद जमावखोरांना घराकडे आणून लाठ्या-काठ्या, लोखंडी गज व तलवार यासारखे हत्याराने घराचा कॅमेरा व लाईट फोडले. तसेच गणेश कवडे याने दगड आमच्या घराचे दिशेने फेकत पहिल्या मजल्यावरील बेडरूमची खिडकीची काच फोडून नुकसान केले. यासह घराच्या सरंक्षक भिंतीवरून आत प्रवेश करून गळा पकडून शिवीगाळ, दमदाटी केली, तसेच त्याच्याबरोबर असणाऱ्या वरील सर्व जणांनी घराबाहेर येऊन घराचे नुकसान करून जमाव जमवून शिवीगाळ तसेच दमदाटी केली.

# सुरेश वाडकर यांना यंदाचा पंचमरत्न पुरस्कार

पुणे : पद्मश्री सुरेश वाडकर यांना पंचमरत्न' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध संगीतकार आर. डी. बर्मन (पंचमदा) यांचे चाहते असलेल्या पुण्यातील कलावंतांच्या समूहातर्फे हा पुरस्कार देण्यात येतो.



आर. डी. बर्मन यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधत दि. ४ जानेवारी रोजी आयोजित री-डिस्कव्हरींग पंचम' या विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. हा कार्यक्रम गणेश कला क्रीडा मंच येथे सायंकाळी ६ वाजता होईल. यानिमित्त सांगीतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे. मानचिन्ह, पुणेरी पगडी, शाल आणि श्रीफळ असे 'पंचमरत्न' या पुरस्काराचे स्वरूप आहे. याआधी हा पुरस्कार कर्सी लॉर्ड, मनोहरी सिंघ (मनोहरीदा), शैलेंद्र सिंग, तौफिक कुरेशी, नितीन शंकर अशा पंचमदां सोबत काम केलेल्या अनेक कलाकारांना प्रदान करण्यात आला आहे.

# हरिविलास कासट यांच्या हस्ते लोकमान्य ईंटेग्रेटीव्ह पॅलिएटिव्ह केअर युनिटचे उद्घाटन

पुणे । प्रतिनिधी

लोकमान्य मेडिकल रिसर्च सेन्टर पुणे, चिंचवड, येथे दि. १६ डिसेंबर रोजी सोमवार रोजी श्री हरिविलास कासट यांच्या शुभ हस्ते लोकमान्य ईंटेग्रेटीव्ह पॅलिएटिव्ह केअर युनिटचा उद्घाटन सोहळा पार पाडण्यात आला.



सदर उद्घाटन सोहळ्याप्रसंगी श्री हरिविलास कासट, श्री रमेश मोहनलाल कासट, डॉक्टर विक्रम घोले (विश्वस्त), डॉक्टर विशाल क्षीरसागर, श्रीनिवास पत्तार, (संचालक), सौ. नि राजन, (सह संचालक) सौ. मौली मॅडम (सचिव), सौ स्मिता उबाळे (प्राचार्य). इ. मान्यवर उपस्थित होते. लोकमान्य मेडिकल रिसर्च सेन्टर चे चार दशकामध्ये केलेल्या सामाजिक आरोग्य क्षेत्राने केलेल्या कार्याचे उल्लेख केला. विशेषतः कॅन्सर केअर, सेफलाइफ इनीशिएटिव्ह, औधोगिक व्यवसाय उत्पन्न आजार, संधित कार्य, आरोग्य शिक्षण, आयुष इंटिग्रेटीव्ह या पाच क्षेत्रात उल्लेखनीय कामाचे उहापोह केले. त्यानंतर लोकमान्य होलिस्टिक कॅन्सर चे डॉक्टर विशाल क्षीरसागर यांनी कॅन्सर सेन्टर ची माहिती दिली. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते डॉक्टर प्रिन्स जॉय (परिहार सेवा तज्ञ) यांनी ''परिहार सेवा काळाची गरज '' या विषयावर आपले व्याख्यान सादर केले. डॉक्टर व्ही. जी. वैद्य यांनी दिलेल्या शुभेछया आणि पॅलिएटिव्ह केअर युनिट मागील भूमिका मांडली.ङ्गआपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी पॅलिएटिव्ह सारे बद्दल समज गैरसमज गरज आणि परिहार सेवेचे कार्य होसपाईस गरज यावर मार्गदर्शन केले.ङ्गपिंपरी-चिंचवड शहरामध्ये प्रथमच या सेवेची उपलब्धता करून दिल्याबद्दल डॉ. व्ही. जी. वैद्य (कार्यकारी विश्वस्त)यांनी आभार व्यक्त केले, आणि पॅलिएटिव्ह केअर एन्ड ऑफ लाईफ नसून टर्मिनली ईल पेशंट साठी ट्रीटमेंटची सुरुवात होय. या सेवेचा लाभ पिंपरी-चिंचवडकर व इतर जवळच्या परिसरातील लोकांनी घ्यावा. श्री. श्याम हरिविलास कासट (उपाध्यक्ष) यांनी समस्थ कासट परिवारातर्फे देण्यात आलेल्या पॅलिएटिव्ह केअर उभारण्यासाठी देणगी ही योग्य ठिकाणी दिल्याचे समाधान व्यक्त केले. लोकमान्य या पदवी ला साकारून काम करतील अशी ही आशा केली. त्यानंतर श्री. श्रीधर वामनराव लोखंडे (स्वयंसेवक) यांनी पॅलिएटिव्ह केअर मध्ये स्वयंसेवकांची गरज व आदर्श भूमिका यावर मत मांडले. कार्यक्रमाची सांगता व आभारप्रदर्शन लो.मे.री. से. चे कार्यकारी संचालक, विश्वस्त डॉ. व्ही. एस. घोले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बिना राजन यांनी केले.

# तीन वाहन चोरटे अटकेत; पाच गुन्हे उघडकीस

पुणे । प्रतिनिधी

मोटरसायकल चोरी करणार्या चोरट्यांकडून चोरीच्या सात मोटरसायकल व त्यांचे सुटे भाग हस्तगत करत चोरीचे एकूण पाच गुन्हे उघडकीस आणण्यात महाळुंगे पोलिसांना यश आले. याप्रकरणी पोलिसांनी तीन जणांना जेरबंद करीत ३ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.




अतुल गावडे (वय १९), गणेश भगत (वय १८) आणि अजित जाधव (वय २३) अशी अटक चोरट्यांची नावे आहेत. महाळुंगे एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी हद्दीत पेट्रोलिंग तसेच गुन्हा घडलेल्या ठिकाणी सीसीटीव्ही फुटेज पाहून आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. सीसीटीव्हींचा बारकाईने तपास केला असता तीन इसम वेगवेगळ्या ठिकाणी मोटरसायकल चोरी करताना दिसून आले. त्यांच्याबाबत अधिक माहिती घेतली असता संबंधित चोरटे मंचर (ता. आंबेगाव) येथील असल्याची माहिती पोलिसांना समजली. त्यानुसार पोलिसांनी मंचरच्या खानवस्ती येथून गावडे, भगत आणि जाधव या तिघांना ताब्यात घेत त्यांच्याकडे कौशल्यपूर्ण तपास केला. या चौकशीत आरोपींनी महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतून तसेच परिसरातून वेगवेगळया ठिकाणावरून सात मोटरसायकली चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरी केलेल्या एकूण चार मोटरसायकली व तीन मोटरसायकलींचे चेसीस, इंजिन, मॅक व्हील असे सुटे भाग हस्तगत करण्यात आले. तसेच या चोरटचांकडून महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे येथील तीन, तळेगाव दाभाडे आणि चंदननगर (पुणे शहर) पोलीस ठाण्यातील प्रत्येकी एक, अशा एकूण पाच गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले. महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पूर्व हवेलीत बिबट्याचा वावर वाढला

हवेली । प्रतिनिधी

सोरतापवाडी, टिळेकरवाडी व पूर्व हवेलीत बिबट्याचा वावर वाढला असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन वनपरिमंडळ अधिकारी प्रमोद रासकर यांनी केले आहे.

सोरतापवाडी परिसरातील माळवाडी येथे भरवस्तीत रविवारी संध्याकाळी बिबट्या दिसल्याचे नागरिकांनी सांगितले. काही हौशी नागरिकांनी त्याचा फोटो पण काढला व सोशल मिडियावर व्हायरल केला आहे. ही माहिती सोरतापवाडी परिसरात कळताच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण झाले आहे.



टिळेकरवाडीमध्ये सतत बिबट्या दिसत असून लोणकरवस्ती परिसरात रवींद्र लोणकर यांच्या शेतामध्ये दुपारी बिबट्या दिसल्याची माहिती पोलीस पाटील विजय टिळेकर यांनी दिली. दुपारी टिळेकरवाडी येथे तर संध्याकाळी सोरतापवाडी परिसरात बिबट्या दिसल्याने पुर्व हवेलीतील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. माळवाडी येथील शेतकरी सचिन चौधरी यांच्या घराजवळुन पाँली हाऊसच्या कडेने थेऊरकर मळयातुन रेल्वे लाइनच्या शेजारी बिबट्या गेल्याचे नागरिकांनी सांगितले. नागरिकांनी शक्यतो रात्रीच्या वेळी बाहेर पडु नये असे आवाहन पोलीस पाटील दत्तात्रय चौधरी यांनी केले आहे. गेल्या आठ-दहा दिवसापासून बिबट्याचा वावर हवेली तालुक्यात वाढला आहे. आज वन अधिकारी अशोक गायकवाड यांनी सोरतापवाडी परिसरात पाहणी केली व नागरिकांकडुन माहिती घेतली. यावेळी मनोज चौधरी, सचिन चौधरी, अविनाश मेमाणे दिलीप चौधरी आदी उपस्थित होते. टिळेकर वाडी येथे माजी सरपंच सुभाष लोणकर व त्यांचे बंधू रवींद्र लोणकर यांच्या शेतात ऊस तोड चालू असताना बिबट्या ऊस तोड कामगारांना दिसला. त्यानंतर पोलीस पाटील विजय टिळेकर यांनी ताबडतोब वन विभागाला याची माहिती दिली. त्यानंतर आज (सोमवारी)संध्याकाळी रेस्क्यू टीम टिळेकर वाडी येथे पाहणी करण्यासाठी आली. शेतात काम करताना दिवसा काम करावे शक्यतो शेतात रात्रीचे काम टाळावे. रात्रीच्या वेळी आवश्यक असल्यास ग्रामस्थांनी बॅटरी, काठी, व तीनचार जणांच्या ग्रुपने जावे. असे आवाहन वन परिमंडल अधिकारी प्रमोद रासकर यांनी केले आहे. यावेळी पोलीस पाटील विजय टिळेकर व वन अधिकारी अशोक गायकवाड उपस्थित होते.

# पिंपरी डेअरी फार्म उड्डाणपुलाचे काम संथ गतीने

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी डेअरी फार्म उड्डाण पुलाचे काम पूर्ण करण्यासाठी दोन वर्षांची मुदत देण्यात आली होती. पुढील तीन महिन्यांत कामाची मुदत संपुष्टात येणार आहे. तरी देखील पुलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु आहे. मुदतीत काम पूर्ण करणे शक्य नसल्यामुळे ठेकेदार मुदतवाढ घेण्यासाठी बीआरटी स्थापत्य प्रकल्प विभागाकडे अतोनात प्रयत्न करत आहे.

पिंपळे सौदागर, रहाटणी, पिंपरी कॅम्प मार्गे पिंपरी गावातून पुणे-मुंबई महामार्गावर जाण्यासाठी वाहनांना पिंपरी डेअरी फार्म रस्त्याने बाहेर पडावे लागत होते. तर, पुणे-मुंबई महामार्गाने पिंपरी कॅम्पात व पिंपरी गावातून पुढे जाण्यासाठी याच मार्गाचा वापर करावा लागत होता. दरम्यान, लोहमार्गावर फाटक पडल्यानंतर दोन्ही बाजुला प्रचंड वाहतूक कोंडी होत होती. तब्बल दहा ते पंधरा मिनिटे वाहनांना एकाच जागी थांबावे लागत होते. त्यामुळे वाहनचालकांची गैरसोय होऊन नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता. यावर तोडगा काढण्यासाठी



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बीआरटी स्थपत्य प्रकल्प विभागामार्फत पिंपरी डेअरी फार्म रस्त्यावर उड्डाणपूल बांधण्यास ३१ मार्च २०२३ रोजी सुरुवात करण्यात आली. उड्डाणपुलाची लांबी १ हजार २९० मीटर इतकी आहे. तर, रुंदी १७.२० मीटर इतकी आहे. या कामासाठी ६५ कोटी २८ लाख एवढा खर्च केला जात आहे. उड्डाण पुलाचे काम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदाराला ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदत दिलेली आहे. पुढील तीन महिन्यात दोन वर्षांचा कालावधी संपुष्टात येत आहे. तरी देखील पुलाचे काम वेगाने मार्गी लावण्याच्या हालचाली दिसत नाहीत. अत्यंत संथ गतीने काम सुरु असल्यामुळे मुदतीत काम पूर्ण करणे शक्य नसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कंत्राटदाराने पुलाचे शंभर टक्के काम पूर्ण करण्यासाठी महापालिकेकडे मुदतवाढीची मागणी केली आहे. पुलाचे काम पूर्ण करुन घेण्याची अपरिहार्यता असल्यामुळे बीआरटी स्थापत्य प्रकल्प विभागाने मुदतवाढ देण्याची तयारी दर्षविली आहे. त्यामुळे पुलाचे काम पूर्ण करण्यासाठी ऑगस्ट २०२५ उजाडणार असून कंत्राटदाराला काम पूर्ण करण्यासाठी पाच महिन्यांची मुदतवाढ देण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. पिंपरी डेअरी फार्म उड्डाण पुलाच्या रचनेत काहीसा बदल करण्यात आला आहे. नव्याने तयार करण्यात आलेले पुलाचे डिजाइन लोहमार्ग विभागापुढे सादर केले जाणार आहे. त्यानंतर रेल्वे खात्याची परवानगी घेऊन पुलाच्या उर्वरित कामाला सुरुवात केली जाणार आहे. तब्बल दोन वर्षांची मुदत संपुष्टात येत असताना देखील पालिकेकडून रेल्वे खात्याची सुधारित परवानगी घेण्यास विलंब करण्यात आला. त्यामुळे पुलाच्या कामास आणखी एक अडथळा निर्माण झाला आहे. जोपर्यंत परवानगी मिळत नाही, तोपर्यंत हे काम अर्धवट स्थितीतच राहणार आहे. शिवाय कंत्राटदाराकडून कामाला गती दिली जात नसल्यामुळे मुदतवाढीत तरी काम पूर्ण होणार का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.